# पुणे BAR & BENCH

Journalism For Justice!

▪ PRGI No. : MHBIL/25/A1380

▪ वर्ष : 1 ▪ अंक : 13 ▪ साप्ताहिक ▪ पुणे ▪ सोमवार, दिनांक 24 ते 30 नोव्हेंबर 2025 ▪ Email : punebarandbench@gmail.com ▪ पाने : 16 ▪ स्वागतमूल्य : 10 रुपये

अंक व जाहिरातींसाठी : 9823016361




पान 7 माझा पहिला खटला

आजाराने त्रस्त मुलीच्या आत्महत्येसाठी तिचा काळजी घेणारा पिताच आरोपी बनवला, तेव्हा मी कोर्टात हा 'छळ' नव्हे, तर 'काळजी' होती हे सिद्ध केले. कायद्याचा कस लावणाऱ्या त्या पहिल्याच युक्तिवादात, आरोपी पित्याची निर्दोष मुक्तता हाच माझ्या वकिलीतील पहिला मोठा आणि निर्णायक विजय ठरला...


पुणे BAR & BENCH

सर्व प्रकारच्या जाहीर सूचना/ वकील नोटीस आणि अन्य जाहिराती स्वीकारण्याकरिता संपर्क : ९८२३०१६३६१

• ऑफिस संपर्क: ०२०-२९९९ २६३०

Vijay Chavan

UPI ID: vijay.chavan1000@okhdfcbank

QR Code स्कॅन करा, पे करा.

रक्कम भरल्याची पेमेंट रिसीट, आपले नाव, पिनकोडसह पूर्ण पत्ता आणि मोबाईल नंबर ९९२२९६२५३५ / ९८२३०१६३६१ या क्रमांकावर मॅसेज करा!

SUPER OFFER

वर्गणीचे पर्याय

• स्वागत मूल्य फक्त ₹. 10

• एक वर्षासाठी : ₹. 500


## मूलभूत हक्क म्हणजे काय ? ते कोणाच्या विरोधात उपलब्ध आहेत!

### भारतीय राज्यघटनेतील भाग तीन सांगतो नागरिकांचे मूलभूत हक्क

**भारतीय लोकशाहीचा आत्मा असलेल्या भारतीय संविधानाला २०२५ साली ७५ वर्षे पूर्ण होत आहेत. यानिमित्ताने, या अमृतमहोत्सवी वर्षाचे औचित्य साधून, आपल्या वृत्तपत्राच्या वाचकांसाठी आम्ही 'संविधानाचा जागर' हे विशेष सदर सादर करीत आहोत. यानिमित्ताने, आम्ही आपल्यासाठी घेऊन आलो आहोत एक ज्ञानमय आणि विचारप्रवर्तक सदर. या सदरात, विचारवंत गुरूवर्य ॲड. डॉ. सुधाकरराव इ. आव्हाड हे भारतीय संविधानातील प्रत्येक पैलूवर प्रकाश टाकणार आहेत.**

**भाग ६**

भारतीय राज्यघटना भाग ३ च्या कलम १२ ते ३५ मध्ये मूलभूत हक्कांची तरतूद केली आहे. राज्यघटनेचा भाग तीन हा घटनेचा उदय आहे असे म्हटले तरी चालेल. ब्रिटिशांनी भारतीयांची गळचेपी केली होती. या पार्श्वभूमीवर राज्यघटनेची निर्मिती झाली. गुलामगिरी, पारतंत्र्य, कोणतेही अधिकार नसल्याची स्थिती या पार्श्वभूमीवर जे मूलभूत हक्क निर्माण केले आहेत, ते वैशिष्ट्यपूर्ण आहेत.




ॲड. डॉ. सुधाकरराव आव्हाड

राज्यघटना रुपी अमृतकुंभ निर्माण होत असताना २९४ तज्ज्ञांनी ११ महिने १८ दिवस काम केले. त्यातही ११४ दिवस सलग काम त्यांनी याविषयी केले होते.

जागर संविधानाचा

(पान 4 पहा) ▸▸

# निवृत्तीनंतर बांधली मोट, चढवला 'काळा कोट'

### गेल्या तीन वर्षांत तब्बल 495 'ज्येष्ठ' बनले कायद्याचे विद्यार्थी! निवृत्त अधिकारी, शिक्षक, आयटी तज्ज्ञ ते गृहिणी, निवडताहेत 'सेकंड करिअर', ज्येष्ठांची लॉ कॉलेजेसकडे वाढती गर्दी


विजय चव्हाण

punebarandbench@gmail.





साठी पार केली की, निवृत्ती घेऊन शांत आणि निवांत आयुष्य जगायचं, ही पारंपरिक धारणा आता कालबाह्य होत आहे. विविध क्षेत्रांतून निवृत्त झालेले तज्ज्ञ आणि ज्येष्ठ नागरिक आता कायद्याच्या अभ्यासक्रमाकडे (एलएल.बी) वळू लागले आहेत.

पूर्वी कायद्याचा अभ्यास हा केवळ तरुणाईचा प्रांत मानला जायचा. परंतु, आता ५० ते ८० वयोगटातील नागरिक मोठ्या संख्येने प्रवेशासाठी अर्ज करत आहेत.

पुणे विद्यापीठाच्या आकडेवारीनुसार, गेल्या तीन वर्षांत साठीच्या पुढील तब्बल ४९५ होते. ६० वर्षे वयोगटातील १२५ विद्यार्थी आहेत, तर ६१ वर्षांचे १०४ विद्यार्थी आहेत. विशेष म्हणजे, ८० वर्षांवरील विद्यार्थीदेखील या अभ्यासक्रमात सक्रिय आहेत. ८३ व्या वर्षीही एक विद्यार्थी कायद्याचे शिक्षण घेत आहे. ही आकडेवारी स्पष्ट करते की निवृत्तीनंतर आपल्या दीर्घ अनुभवाचा वापर कायदेशीर साक्षरता आणि समाजसेवेसाठी करण्याची तीव्र इच्छा ज्येष्ठांमध्ये वाढली आहे. शिक्षणासाठी 'वय' ही केवळ एक संख्या आहे, हेच यातून सिद्ध होते.

विधी अभ्यासक्रमात ज्येष्ठांची गर्दी वाढू लागल्याने, त्यांच्या अनुभवाची शिदोरी आणि कायद्याचे नवीन ज्ञान यांचा समन्वय साधून 'न्याय'दानाची प्रक्रिया अधिक समृद्ध होणार आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने नुकताच वयाची ७३ वर्षे पूर्ण केलेल्या नागरिकांनाही तीन वर्षांच्या एलएल.बी. अभ्यासक्रमासाठी प्रवेश देण्याचा घेतलेला निर्णय ज्येष्ठ नागरिकांच्या अभ्यासक्रमाकडे वाढत्या कलामुळे घातल्याचे वास्तव समोर आले आहे.

(पान 4 पहा) ▸▸


YUVRAJ DHAMALE CORP

'युवराज ढमाले कोर्प' कडून पुणे BAR & BENCH वृत्तपत्राला पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा!

# कौटुंबिक न्यायालयात प्रथमच साजरा झाला आंतरराष्ट्रीय पुरुष दिवस



पुणे बार अँड बेंच टीम
punebarandbench@gmail.com

शिवाजी नगर येथील कौटुंबिक न्यायालयात पहिल्यांदाच आंतरराष्ट्रीय पुरुष दिवस संपन्न झाला. कौटुंबिक न्यायालयाचे प्रमुख न्यायाधीश श्याम रुक्मे, न्यायाधीश कविता ठाकूर, सर्वश्री न्यायाधीश भाटिया, न्या.कदम, न्या.यादव, महाराष्ट्र आणि गोवा वकील परिषदेचे नवनिर्वाचीत अध्यक्ष अॅड. अहमद खान पठाण, महाराष्ट्र आणि गोवा वकील परिषद विद्यमान सदस्य अॅड. राजेंद्र उमाप,पुणे फॅमिली कोर्ट लॉयर्स असोसिएशन च्या अध्यक्ष कल्पना निकम उपाध्यक्ष अॅड. स्मिता देशपांडे व सर्व वकील उपस्थित होते.

अॅड. अहमदखान पठाण यांचा सत्कार संपन्न झाला. कार्यक्रम प्रसंगी प्रमुख न्यायाधीश श्याम रुक्मे, न्यायाधीश कविता ठाकूर, न्यायाधीश बी.डी.कदम व महाराष्ट्र आणि अॅड. अहमद खान पठाण, अॅड. राजेंद्र उमाप, कल्पना निकम यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सूत्र संचालन कोमल देशमुख यांनी केले. आभार अॅड. अमृता पवार यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पुणे फॅमिली कोर्ट लॉयर्स असोसिएशनच्या सर्व सभासदांनी परिश्रम घेतले.

# ज्येष्ठ विधिज्ञ अॅड. मोहनराव वसंतराव डोंगरे कालवश

## पन्नास वर्षांच्या अखंड सुवर्ण कारकिर्दीचा प्रवास थांबला

पुणे बार अँड बेंच टीम
punebarandbench@gmail.com

पुण्याच्या विधी क्षेत्रातील एक आदरणीय आणि मार्गदर्शक व्यक्तिमत्त्व, माजी न्यायाधीश आणि ज्येष्ठ विधिज्ञ अॅड. मोहनराव वसंतराव डोंगरे यांचे नुकतेच दुःखद निधन झाले आहे. त्यांनी नुकतीच वयाची ७५ वर्षे पूर्ण केली होती. १८ नोव्हेंबर २०२५ रोजी अल्पशा आजाराने त्यांची प्राणज्योत मालवली.

अॅड. डोंगरे यांनी ८ ऑगस्ट १९७५ रोजी कायद्याची मशाल हाती घेऊन आपल्या वकिली सेवेची नुकतीच ५० वर्षांची अभूतपूर्व कारकीर्द पूर्ण केली होती. वयाच्या ७५ व्या वर्षातही त्यांचे कार्य तेवढ्याच तेजाने तळपत होते. ते केवळ पुण्याचे ज्येष्ठ आणि कसलेले वकीलच नव्हते, तर ते न्यायमंदिराचे एक भक्कम आधारस्तंभ होते. १९८४ ते १९८७ या काळात न्यायाधीश म्हणून त्यांनी दिलेला न्याय असो, किंवा माजी



गृहराज्यमंत्री रमेश बागवे आणि साध्वी प्रज्ञासिंग प्रकरणासारख्या महत्त्वाच्या खटल्यांमध्ये दिलेली कायदेशीर लढाई असो, प्रत्येक वेळी त्यांनी आपले कर्तृत्व सिद्ध केले.

फौजदारी आणि दिवाणी क्षेत्रात 'संयमी आणि जेंटलमॅन' म्हणून त्यांची ओळख होती. यासोबतच ते समाजवादी विचारवंत आणि प्रखर हिंदू धर्मनिष्ठ म्हणूनही ओळखले जात. त्यांच्या निधनाने पुणे शहर आणि विधी क्षेत्रावर शोककळा पसरली असून, ही एक न भरून येणारी मोठी हानी मानली जात आहे.

कै. मोहनराव वसंतराव डोंगरे यांच्या पश्चात शोकाकुल कुटुंबाकडून पुढील विधी आयोजित करण्यात आले आहेतः दशक्रिया विधी २७ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ९:०० वाजता संगम घाट, आरटीओ ऑफिस शेजारी, पुणे येथे संपन्न होईल. याच दिवशी दहावा दिवस भोजन (श्रद्धांजली सभा) जयश्री हॉल, सुभाष नगर, शुक्रवार पेठ, पुणे येथे दुपारी १२:०० ते २:०० या वेळेत ठेवण्यात आला आहे, तर तेरावा दिवस भोजन (तेरवा) ३० नोव्हेंबर २०२५ रोजी याच जयश्री हॉलमध्ये दुपारी १२:०० ते २:०० या वेळेत होणार आहे. सर्व आप्तस्वकीय, मित्रमंडळी आणि हितचिंतकांनी या वेळी उपस्थित राहून कै. डोंगरे यांना श्रद्धांजली अर्पण करावी, अशी विनंती त्यांच्या कुटुंबीयांनी केली आहे.

त्यांच्या पश्चात पुणे बार अँड बेंचच्या व्यवस्थापकीय संचालक अॅड. पल्लवी विशाल काळे या त्यांच्या कन्या, तर व्यवस्थापकीय संपादक अॅड. विशाल विजयराव काळे हे त्यांचे जावई आहेत.

# 'सर्वोच्च न्यायालयाची क्रूरतेविषयी ठोस व्याख्या नाही'

## 'कायदा कट्टा' व्याख्यानमालेत 'कंपॅरिटीव्ह डिस्कशन ऑन डिव्होर्स लॉ' या विषयी अॅड. भूषण कुलकर्णी यांचे व्याख्यान

पुणे बार अँड बेंच टीम
punebarandbench@gmail.com





क्रूरता ही अशी संकल्पना आहे ज्यामुळे घटस्फोट घेण्यासाठी निमित्त मिळते. सर्वोच्च न्यायालयाने क्रूरतेविषयी ठोस अशी व्याख्या केलेली नाही. व्यक्तीपरत्वे क्रूरता वेगवेगळी असू शकते. वकिलांनी या कारणामुळे पती पत्नीच्या घटस्फोटाचा खटला दाखल केला असेल तर क्रौर्याची घटना कधी घडली याचा दिनांक, वेळ आणि ठिकाण नमूद केलेच पाहिजे,असे अॅड. भूषण कुलकर्णी यांनी मंगळवारी येथे सांगितले.

द पुणे फॅमिली कोर्ट लॉयर्स असोसिएशन तर्फे आयोजित 'कायदा कट्टा' व्याख्यानमालेत 'कंपॅरिटीव्ह डिस्कशन ऑन डिव्होर्स लॉ' या विषयी अॅड. कुलकर्णी यांचे व्याख्यान झाले. अध्यक्षस्थानी असोसिएशनच्या अध्यक्ष कल्पना निकम होत्या. असोसिएशनच्या उपाध्यक्ष स्मिता देशपांडे तसेच उपाध्यक्ष प्रथमेश भोईटे, सचिव कोमल देशमुख व्यासपीठावर होते.

कुलकर्णी यांनी घटस्फोटाचे प्रकार, हिंदू विवाह कायदा, विशेष विवाह कायदा, घटस्फोट कायदा, पारशी विवाह आणि घटस्फोट कायदा, मुस्लिम कायदा आदींबाबत सविस्तर माहिती दिली.

परस्पर संमतीने घटस्फोट घ्यायचा असेल तर एका वर्षातही तो घेता येतो. एकमेकांशी पटत नाही हे कारण देऊन खटला दाखल करता येतो. दोन हायकोर्टांच्या निर्णयानुसार दोन वर्षांचा कालावधी आता एक वर्षावर आला आहे, असे कुलकर्णी यांनी सांगितले.

ते म्हणाले की अनैतिक संबंधांच्या केवळ संशयावरून घटस्फोटाचा खटला दाखल करता येत नाही. पती किंवा पत्नीचे त्रयस्थाशी शारीरिक संबंध आहेत हे पुराव्यानिशी दाखवून द्यावे लागते. लैंगिक संबंध झालाच नसेल तर वकील तो प्रकार म्हणजे अनैतिक संबंध आहेत हे सिद्ध कसे करणार? ज्या व्यक्तीशी तसे संबंध आले आहेत त्याचे नाव खटल्यामध्ये सह प्रतिवादी म्हणून आले पाहिजे. नाव व, पत्ता माहिती नसेल तर आपल्याला प्लिडींग करावे लागते की आम्हाला त्या व्यक्तीचे नाव माहिती नाही म्हणून खटल्यात दाखल केले नाही. असा खटला स्थगित राहू शकतो. अनैतिक संबंधांच्या संशयामुळे घटस्फोटाचा खटला दाखल झाला तरी संबंधितांमध्ये शारिरीक संबंध होते हे सिद्ध करावे लागते, तरच तो अनैतिक संबंध ठरतो.

हिंदू विवाह कायदा १९५५ नुसार पती आणि पत्नी दोघांसाठी व्याभिचार, क्रूरता, त्याग, धर्मांतर, मानसिक अस्वस्थता, असाध्य कुष्ठरोग, संसर्गजन्य स्वरूपात लैंगिक आजार संन्यास, ७ वर्षांपेक्षा जास्त काळ बेपत्ता असणे आदी कारणांवरून घटस्फोट दिला जातो, असे त्यांनी नमूद केले.

ते म्हणाले "मुस्लिम कायद्यात पतीकडून तलाक देताना तलाक उल बिद्दत - तिहेरी तलाक यावर आता बंदी आहे. पत्नीशी शारीरिक संबंध ठेवण्यास नकार देणारा पती अशा तलाकसाठी अर्ज करु शकतो. मुस्लिम कायद्यात पत्नीकडून तलाक दिला जात असताना तलाक ए तफवीज मध्ये पत्नीवर व्यभिचाराचा खोटा आरोप करणारा पती हे कारण असू शकते."

त्यांनी १९३९ चा मुस्लिम विवाह रद्द करण्याचा कायदा याविषयी सांगितले की पत्नीसाठी जी कारणे आहेत त्यात ४ वर्षांपासून पतीचे ठिकाण माहित नाही दोन वर्षांपासून पोटगी न देणारा पती, ७ वर्षे किंवा त्याहून अधिक तुरुंगवास, ३ वर्षे किंवा त्याहून अधिक काळ वैवाहिक कर्तव्ये पार पाडण्यात पती अयशस्वी असणे, लग्नाच्या वेळी पती नपुंसक आहे आणि तो आजही तसाच आहे, वेडेपणा २ वर्षे किंवा विषाणूजन्य लैंगिक आजार, क्रूरता मुस्लिम कायद्याअंतर्गत वैध असलेल्या इतर कोणत्याही कारणास्तव घटस्फोट मागता येतो.

असोसिएशनच्या उपाध्यक्ष स्मिता देशपांडे यांनी कुलकर्णी यांचा परिचय करून दिला. सचिव कोमल देशमुख यांनी आभार मानले.

# जाणून घ्या कायद्याची भाषा




**शपथपत्र (Affidavit) :** न्यायालयात किंवा कायदेशीर कार्यवाहीसाठी स्वेच्छेने आणि शपथेवर दिलेले लेखी विधान, जे सत्य असल्याचे घोषित केलेले असते.

**पुराव्याचा भार (Burden of proof) :** न्यायालयात आपले म्हणणे किंवा आरोप सिद्ध करण्याची कायदेशीर जबाबदारी (सामान्यतः फिर्यादीवर असते).

**नुकसान भरपाई (Compensation/ Damages) :** दुसऱ्या पक्षाने केलेल्या नुकसानीबद्दल किंवा हानीबद्दल पीडित व्यक्तीला आर्थिक स्वरूपात दिलेली भरपाई.

**मध्यस्थी (Arbitration/ Mediation) :** न्यायालयाबाहेर, त्रयस्थ व्यक्तीच्या (मध्यस्थ) मदतीने वाद मिटवण्याची पर्यायी प्रक्रिया.

**अपील (Appeal) :** न्यायालयाने दिलेल्या निर्णयावर असमाधानी असल्यास, त्या निर्णयाविरुद्ध उच्च न्यायालयात केलेले आव्हान किंवा विनंती.

**फसवणूक (Fraud/Cheating) :** जाणूनबुजून खोटी माहिती देऊन किंवा विश्वासघात करून दुसऱ्या व्यक्तीचा गैरफायदा घेणे किंवा नुकसान करणे.

**अवैध (Illegal/ Unlawful) :** जो कायदा, नियम किंवा सार्वजनिक धोरणाविरुद्ध आहे, असा कृती किंवा व्यवहार.


**वॉरंट (Warrant) :** पोलीस किंवा इतर अधिकाऱ्यांना व्यक्तीला अटक करण्याचा, झडती घेण्याचा किंवा विशिष्ट कृती करण्याचा अधिकार देणारा न्यायालयाचा लेखी आदेश.

**बंधनकारक (Binding) :** कायदेशीररित्या पाळणे आवश्यक असलेले किंवा अंमलात आणता येणारे (उदा. करार किंवा न्यायालयाचा निर्णय).

**सुधारणा (Amendment) :** अस्तित्वात असलेल्या कायद्यात, नियमात किंवा संविधानात केलेला अधिकृत बदल किंवा दुरुस्ती.

**खटला (Lawsuit/Case) :** न्यायालयात चालणारे संपूर्ण प्रकरण किंवा कायदेशीर वाद.

## शांतता... हे कोर्ट आहे!




*या धबडग्यातून वेळ मिळालाच तर माझ्या रोजच्या कामांच्या यादीत मी कधी कधी सुनावणी आणि न्यायदानही समाविष्ट करतो!* *(संकल्पना : विजय चव्हाण)*

# उशिरा ताबा, पाणीटंचाई आणि सुविधांच्या त्रुटीबद्दल राष्ट्रीय आयोगाचा बिल्डरला दंड

## बिल्डर बी. यू. भंडारी आणि रविराज डेव्हलपर्सना राष्ट्रीय आयोगाचा ऐतिहासिक दणका
## पिंपळे सौदागर येथील प्लॅनेट मिलेनियम सोसायटीच्या तक्रारीवर आयोगाचा महत्त्वपूर्ण निर्णय

**पुणे बार अँड बेंच टीम**
punebarandbench@gmail.com

वीस वर्षांहून अधिक काळ चाललेल्या कायदेशीर लढाईनंतर, राष्ट्रीय ग्राहक आयोगाने (एनसीडीआरसी) बांधकाम व्यावसायिक बी. यू. भंडारी आणि रविराज डेव्हलपर्स यांच्या विरोधात प्लॅनेट मिलेनियम सोसायटी, पुणे येथील सदनिकाधारकांच्या बाजूने ऐतिहासिक निर्णय दिला आहे. अखिल भारतीय ग्राहक पंचायत आणि सोसायटीच्या सभासदांनी ८ एप्रिल २००५ रोजी आयोगात, नवी दिल्ली येथे तक्रार दाखल करण्यात आली होती.

या प्रदीर्घ प्रवासात तक्रारदारांना अनेक अडचणींचा सामना करावा लागला—दोन वकील मृत झाले, एक दिल्ली सोडून गेले आणि इतरांनी तारखांना उपस्थित राहणे टाळले. यामुळे ७ ऑगस्ट २०२३ रोजी ही केस बरखास्त करण्यात आली होती. मात्र, अखिल भारतीय ग्राहक पंचायतचे विजय सागर आणि सोसायटीचे राजेश पाटील व अनिल नांदेडकर यांनी अथक प्रयत्न करून दिल्लीत जाऊन ही केस पुन्हा रीस्टोअर करून घेतली आणि स्वतः कामकाज पाहिले.

शेवटच्या चार सुनावण्या पुणे येथून वेबेक्स सॉफ्टवेअरद्वारे ऑनलाइन अटेंड झाल्याने ग्राहकांचा वेळ आणि पैसा वाचला. २०१६ मध्ये नेमलेल्या लोकल कमिशनर (व्ही. के. गोसेन) यांच्या पाहणी अहवालानंतर आयोगाने महत्त्वपूर्ण आदेश जारी केले.



राष्ट्रीय आयोगाच्या आदेशानुसार, बिल्डरने सदनिकाधारकांना १ महिना ते ६ महिन्यांच्या उशिरा ताबा दिल्याबद्दल रु. ४,८०,७६१/- इतकी रक्कम ८ एप्रिल २००५ पासून प्रत्यक्ष देय होईपर्यंत ६% व्याजासह द्यावी लागणार आहे. २४ तास पाणीपुरवठ्यासाठी मंजूर आराखड्यानुसार जमिनीखालील १६ आणि इमारतीवरील १६ अशा एकूण ३२ पाण्याच्या टाक्या तीन महिन्यांच्या आत बांधण्याची तरतूद करावी; अन्यथा बिल्डरला तक्रारीच्या तारखेपासून रु. १५ लाख इतकी भरपाई ६% व्याजासह देण्याचे निर्देश आहेत. तसेच, पिंपरी चिंचवड महापालिका नियमांनुसार ड्रेनेज लाईन सिस्टीमचे नियमितीकरण करण्याचा खर्च बिल्डरने उचलावा, आणि स्ट्रॉम वॉटर लाईन तीन महिन्यांच्या आत ड्रेनेजला जोडावी किंवा सोसायटीला रु. ५ लाख द्यावेत. आयोगाने बिल्डरने शाळेला विकलेल्या सुविधा जागेबद्दल पिंपरी चिंचवड महापालिकेने चौकशी करून त्याला मान्यता मिळाली आहे की नाही, हे तपासण्याचे निर्देश दिले आहेत.

याशिवाय, पिंपरी चिंचवड महापालिकाला प्रकल्पाचे सर्वेक्षण करून जाहिरातीत नमूद केल्याप्रमाणे जॉगिंग ट्रॅक, स्केटिंग ट्रॅक आणि क्लब हाऊस उपलब्ध आहेत की नाही हे तपासण्यास सांगितले आहे आणि नसतील तर ते उपलब्ध करून देण्याचे निर्देश बिल्डरला द्यावेत. सोसायटीच्या आवश्यकतेनुसार आणि पिंपरी चिंचवड महापालिकेच्या नियमांनुसार कन्व्हेन्स (खरेदीखत) आणि शॉपिंग युनिट्सचे वाटप करण्यासाठी सोसायटीला आदेश देण्यात आले आहेत.

विशेष म्हणजे, बिल्डरने सोसायटीच्या नावावर जमिनीचे खरेदीखत (कन्व्हेन्स डीड) करून दिले नाही ही सेवेतील त्रुटी मान्य केली आहे. या केसमध्ये विरोधी पार्टी असलेल्या पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेला बांधकाम प्लॅनप्रमाणे झाले आहे की नाही, हे तपासण्याचे आदेशही देण्यात आले आहेत.

पान 1 वरून

# निवृत्तीनंतर बांधली मोट, चढवला 'काळा कोट'

निवृत्त अधिकारी, बँकर, शिक्षक, व्यावसायिक, आयटी तज्ज्ञ किंवा गृहिणी... या सर्वांनी आपल्या जीवनात मोठा अनुभव गाठीशी जमवला आहे. कायद्याच्या शिक्षणातून त्यांच्या ज्ञानाला कायदेशीर आधार मिळत आहे, ज्यामुळे ते निवृत्तीनंतरही अधिक सन्मानाने, सक्रियतेने आणि प्रभावीपणे समाजासाठी योगदान देऊ शकतात. हा निर्णय ज्येष्ठांसाठी केवळ एक शैक्षणिक संधी नसून, त्यांच्या 'सेकंड करिअर' साठी एक भक्कम आधारस्तंभ बनत आहे.

### विविध क्षेत्रातील ज्येष्ठांची लॉ कॉलेजेसकडे वाढती गर्दी

पूर्वी कायद्याचा अभ्यास हा केवळ तरुणाईचा प्रांत मानला जायचा. परंतु, आता ५० ते ७० वयोगटातील नागरिक मोठ्या संख्येने प्रवेशासाठी अर्ज करत आहेत.

कायदा क्षेत्रातील तज्ज्ञांच्या मते, विविध क्षेत्रातील अनुभव कायद्यातील व्हॅल्यू ॲडिशन ठरू लागला आहे.

निवृत्त प्रशासकीय अधिकार प्रशासकीय कायदे, सरकारी योजना आणि नियमांवर आधारित केसेसमध्ये अचूक मार्गदर्शन करू शकतात. बँकर्स आणि चार्टर्ड अकाउंटंट्स हे आर्थिक गुन्हे, कर कायदा, कंपनी कायदा आणि आर्थिक फसवणुकीच्या प्रकरणांमध्ये तज्ज्ञ सल्ला देऊ शकतात. शिवाय निवृत्त शिक्षक आणि प्राध्यापक शिक्षण हक्क कायदा (आरटीई), कौटुंबिक कायदे आणि बाल न्याय कायद्यांवर आधारित सामाजिक कार्य अधिक नेटाने करू शकतात.

तर माजी पोलीस अधिकारी हे फौजदारी कायदे आणि पुराव्याच्या कायद्यावर (Law of Evidence) आधारित उत्तम वकिली करू शकतात.

या संदर्भात आपले कायदा शिक्षणामागील भूमिका सांगताना पुणेकर असलेले गणेश जोगळेकर (६९ वर्षे) निवृत्त शासकीय अधिकारी, म्हणाले, "प्रशासनात काम करताना अनेक कायद्यांच्या मर्यादांचा अनुभव आला. आता माझ्या प्रशासकीय अनुभवाला कायद्याची जोड देऊन समाजातील गरीब आणि गरजू लोकांना कायदेशीर मदत करायची माझी इच्छा आहे. वयामुळे थांबायचं नाही, तर सुरू करायचं!"

विजयालक्ष्मी अय्यर (६२ वर्षे, निवृत्त बँक व्यवस्थापक, मुंबई) म्हणाल्या, 'बँकेतून निवृत्त झाल्यावर मी कर्ज आणि आर्थिक फसवणुकीचे अनेक प्रकार पाहिले. आता कायद्याचे शिक्षण घेऊन मी ग्राहक संरक्षण आणि आर्थिक साक्षरता या विषयांवर लक्ष केंद्रित करू इच्छिते. निवृत्तीनंतर मिळालेला हा वेळ समाजासाठी वापरायचा आहे.'

### "काळा कोट" आणि संधींचे दालन: अनुभवाचे कायद्यातील रूपांतर

कायदा शिक्षण घेतल्यानंतर केवळ कोर्टात वकिलीच करता येते, हा गैरसमज आहे. एलएल.बी. पदवीधारकांसाठी आज अनेकविध क्षेत्रांमध्ये नोकरी आणि व्यवसायाच्या प्रचंड संधी उपलब्ध आहेत.

### करिअर मार्ग, ज्येष्ठांसाठी खास फायदे आणि संधी:

- १. **मध्यस्थ (Mediator Conciliator)**:
- **खास फायदे**: दीर्घकालीन अनुभव, समजूतदारपणा आणि सामाजिक भान वापरून कोर्टाबाहेर वाद शांतपणे मिटवणे.
- **संधी**: केसनुसार शुल्क आकारणी, समाजासाठी महत्त्वाची आणि प्रतिष्ठित सेवा.

- २. **कायदेशीर सल्लागार (Legal Consultant)**:
- **खास फायदे**: निवृत्त शासकीय अधिकाऱ्यांसाठी कायदे आणि नियमांचा अभ्यास करून सल्ला देणे (उदा. पेन्शन, मालमत्ता, प्रशासन).
- **संधी**: प्रोजेक्टनुसार किंवा दरमहा ५०,००० ते १.५ लाख पर्यंत.

- ३. **न्यायिक सेवा** :
- **खास फायदे**: ज्येष्ठ नागरिक न्यायिक परीक्षांची तयारी करू शकतात.
- **संधी**: निवृत्तीनंतरही न्यायाधीश किंवा न्यायिक अधिकारी म्हणून काम करण्याची संधी, शासकीय स्तरावर सक्रिय आणि सन्मानजनक भूमिका.

- अभ्यासक्रम आणि प्रवेश प्रक्रिया: वयोमर्यादेत शिथिलता

३ वर्षांचा एलएल.बी. अभ्यासक्रमः

- प्रवेशाचे जुने नियम (साधारणतः): सर्वसाधारणपणे पदवीनंतर, ४५ वर्षांपर्यंत.
- **बदललेल्या नियमानुसार वयाची कमाल मर्यादा**: ७३ वर्षांपर्यंत.

- **प्रवेशाची प्रक्रिया**:
- **पात्रता**: कोणत्याही शाखेतील पदवी (B.A., B.Com., B.Sc., इ.) किमान ४५% गुणांसह उत्तीर्ण केलेली असावी.
- **प्रवेश परीक्षा (सीईटी)**: एमएच-सीईटी (MH-CET Law 3 Years) ही परीक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक आहे.
- **वयोमर्यादेतील शिथिलता**: बार कौन्सिल ऑफ इंडिया (BCI) ने यापूर्वी वयोमर्यादा निश्चित केली होती, पण विविध न्यायालयांच्या आदेशामुळे आणि विद्यार्थ्यांच्या मागणीमुळे त्यात वेळोवेळी बदल झाले आहेत.

बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र आणि गोवा माजी अध्यक्ष ॲड. राजेंद्र उमाप सांगतात. 'ज्येष्ठ नागरिक आपल्या जीवनातील अनुभवांची शिदोरी घेऊन कायद्याच्या क्षेत्रात उतरत आहेत. त्यांच्या प्रशासकीय, व्यावसायिक आणि सामाजिक अनुभवाची जोड मिळाल्यास, न्यायाची प्रक्रिया अधिक संवेदनशील आणि प्रभावी होईल.

पान 1 वरून

# भारतीय राज्यघटनेतील भाग तीन; नागरिकांचे मूलभूत हक्क

सोळा दिवस एकाच चॅप्टर किंवा विषयावर सखोल विचार करण्यात आला. या मूलतत्वांची निर्मिती कशी करण्यात आली, याचा विचार केला तर त्याचे श्रेय इंग्लंडकडे जाते. सर्वात जुनी लोकशाही म्हणजे ब्रिटिश लोकशाही! ब्रिटिश लोक भारतीयांना प्रजासत्ताक, गुलामगिरीत ठेवत होते आणि त्यांच्या देशात मात्र 'बिल ऑफ राईट्स'च्या माध्यमातून मूलभूत हक्कांची मागणी करत होते, ही शोकांतिका होती.

इंग्लंडमध्ये १२ व्या शतकामध्ये 'रेनॉसन्स' चे वारे वाहत होते. त्यामुळे मानवी हक्कांविषयी जगभर जागृती निर्माण झाली. फ्रान्समध्ये 'ए क्वेश्चन ऑफ राईट्स ऑफ मॅन' हा ग्रंथ निर्माण झाला. मानवी हक्कांविषयी चळवळ सुरू झाली. याच वेळी अमेरिकेत 'डिक्लरेशन ऑफ राईट्स ऑफ मॅन' ग्रंथ निर्माण झाला. त्यामुळे तेथील जनता सुद्धा नागरी हक्कांविषयी प्रचंड जागरूक झाली.

भारतामध्ये जी मूलभूत हक्कांची निर्मिती झाली, त्यामध्ये इंग्लंड, अमेरिका आणि फ्रान्स यांचा संदर्भ जोडण्यात आला आहे. त्या त्या दस्तावेजांवरुन भारतीय राज्यघटनेतील मूलभूत हक्कांची निर्मिती करण्यात आली, तेव्हा त्यातील प्रत्येक शब्दांत त्या वेळची परिस्थिती, नागरिकांची मानसिकता दडलेली आहे.


भारतात मूलभूत हक्कांची मागणी होती. त्यामध्ये आपल्याला राज्यघटना मिळणारच आहेत तर मूलभूत हक्क कसे असावेत याचे पहिली मांडणी डॉ. ॲनी बेझंट यांनी केली. त्यांनी यासंदर्भात 'कॉमनेल्थ ऑफ इंडिया बिल' १९२५ मध्ये मांडले होते. त्यांनी लिहिले होते की आम्हाला स्वातंत्र्याचा अधिकार हवा आहे. नंतर आम्हाला व्यक्तिगत स्वातंत्र्याचा अधिकार हवा आहे. १९४९ मध्ये जी राज्यघटना अस्तित्वात आली, तिचे बीज 'कॉमनेल्थ ऑफ इंडिया बिल' मध्ये आहे.

### मागणी संपूर्ण स्वातंत्र्याची

आपले जे ६० मूलभूत अधिकार आहेत, त्या सदृश्यच आर्टिकल १२ ते ३५ ची रचना करण्यात आली आहे. या आर्टिकल नुसार ८ मूलभुत हक्क देण्यात आले आहेत. त्यामध्ये उपासनेचे स्वातंत्र्य, मत मांडण्याचे स्वातंत्र्य एकत्र येण्याचा अधिकार म्हणजे संघटना स्थापन करण्याचे स्वातंत्र्य, लिंगभेदाच्या आधारावर भेदभाव होता कामा नये, प्राथमिक शिक्षणाचा अधिकार असला पाहिजे.

आज जरी आपण मूलभूत अधिकार म्हणत असलो तरी तो अधिकार आपोआप निर्माण झालेला नाही. १९२८ मध्ये मोतीलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईत काँग्रेसचे अधिवेशन पार पडले. त्यावेळी 'स्वराज्य राज्यघटना' बनवण्यात आली. आम्ही भविष्यात जी राज्यघटना तयार करणार आहोत त्यामध्ये या स्वराज्य घटनेला विशेष स्थान दिले जावे तशी चौकट असावी अशी मागणी मोतीलाल नेहरूंनी केली. खरे पाहता, आपले थोर क्रांतिकारक भगतसिंग यांनी अशी मागणी केली होती की आम्हाला केवळ, स्वातंत्र्य नको, केवळ स्वराज्य नको तर संपूर्ण स्वातंत्र्य हवे. कोणाचेही नियंत्रण नको, मांडलिकत्व नको, जसे काही देशांमध्ये 'कॉमनवेल्थ ऑफ कंट्री' झाले होते तसे नको. संपूर्ण स्वायत्तता पाहिजे. त्या मागणीला क्रांतिकारक सुभाषचंद्र बोस आणि पं. जवाहरलाल नेहरू यांनी पाठिंबा दिला होता.

याचाच अर्थ, आपल्या देशात ब्रिटिशांचे राज्य होते तेव्हापासूनच आपल्या देशामध्ये अशा प्रकारची राज्यघटना हवी, या राज्यघटनेचा गाभा मूलभूत तत्त्वांवर आधारित असावा अशी



भारताचे संविधान

उद्देशिका

आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य घडवण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस :
सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय ;
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा व उपासना यांचे स्वातंत्र्य ;
दर्जाची व संधीची समानता ;
निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकता आणि एकात्मता यांचे आश्वासन देणारी बंधुता प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून ;
आमच्या संविधानसभेत आज दिनांक २६ नोव्हेंबर, १९४९ रोजी याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वतःप्रत अर्पण करीत आहोत.

मागणी होत होती. १९३३ मध्ये त्यामध्ये दुरुस्ती करण्यात आली. अल्पसंख्याकांचे संरक्षण केले जावे ही मागणी सुद्धा समाविष्ट करण्यात आली.

### जगातील मानवी हक्कांसाठीची मागणी समाविष्ट

१९४६ मध्ये भारतीय संविधान निर्माण करणारी समिती स्थापन झाली. पाकिस्तान वेगळा झाला तरीही संविधान समिती राज्यघटना बनवण्याचे काम करतच राहील. त्यावेळी असे ठरले की ही मूलभूत तत्त्वे जे आपण करणार आहोत त्याचा अभ्यास झाला पाहिजे असे अध्ययन झाले पाहिजे चर्चा झाली पाहिजे त्यासाठी १९४७ मध्ये आचार्य जे. बी. कृपलानी यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती निर्माण करण्यात आली. या कमिटीने सखोल अभ्यास केला आणि आपला अहवाल तयार केला. या अहवालाला चार प्रकारचा 'बेस' होता अमेरिका, फ्रान्स आणि इंग्लंड या देशांमध्ये मानवी हक्कांसाठी जी मागणी झाली होती तिचा आधार जोडण्यात आला होता. १९४७ मध्ये पहिल्या आणि दुसऱ्या महायुद्धाचे समाप्ती झाली होती आणि त्यापूर्वीच्या काळात 'युनायटेड नेशन्स ऑर्गनायझेशन' म्हणजे 'यूएनओ'ची स्थापना झाली. ऑर्गनायझेशनच्या समितीतर्फे मानवी आंतरराष्ट्रीय हक्कांच्या संबंधाने, 'डिक्लेरेशन ऑफ ह्यूमन राइट्स'नामक एक जाहीरनामा तयार करण्यात आला होता. हा जाहीरनामा कृपलानी समितीला मदतीशीर ठरला.

आज आपण आपल्या राज्यघटनेमध्ये कलम १२ ते ३५ यांचा अभ्यास केला, तर त्यातील मूलतत्त्वे आपल्याला 'यूनो' च्या जाहीरनाम्यामध्ये सापडतात. त्यांचा अभ्यास करण्यात आला तसेच 'ह्युमन राइट्स'चे जे प्राथमिक बिल आहे त्याचाही अभ्यास करण्यात आला. या सर्वांचा अभ्यास करून कृपलानीने आपला अहवाल घटना समितीला सादर केला.

आपल्या राज्यघटना समितीच्या मसुदा समितीचे अध्यक्ष होते डॉ. भीमराव आंबेडकर. राज्यघटना समितीमध्ये आणि मसुदा समितीमध्ये विचारवंत तत्वज्ञ होते. त्यांची १६ दिवसांच्या दरम्यान सखोल चर्चा होऊन राज्यघटनेमधील हा जो भाग ३ आहे तो अंतिम करण्यात आला. या राजघटनेमधील कलम १२ ते ३५ यांचा जर आपण अभ्यास करायचा ठरवला तर आपल्या असे लक्षात येईल की राज्यघटना समितीमधील जे सदस्य होते ते प्रचंड हुशार लोक होते. त्यांनी दूरदृष्टीने विचार करून आपल्या अनेक पिढ्यांसाठी तरतूद करून ठेवलेली दिसून येईल. त्यातील शब्दांचा अभ्यास केला तर आपल्याला हे दिसून येते की कुणाच्या विरुद्ध हे मानवी अधिकार आहेत.

### कुंपणच शेत खायला लागले तर ? :

भारतीय राज्यघटनेची संरचना करताना घटनाकारांना हे माहिती होते की मूलभूत अधिकारांचे संरक्षण करण्यासाठी कायदे पुरेसे आहेत, परंतु राज्य संस्थांकडून मूलभुत हक्कांचे उल्लंघन झाले, त्यावर गदा येऊ लागली तर काय करायचे? म्हणून घटनाकारांनी केवळ मूलभूत हक्क दिले नाही तर अंमलबजावणीचे अधिकारही दिले. ते जर दिले नसेल तर काय झाले असते? भारतीय राज्यघटनेची विविध कलमे हे आपल्याला सरकार विरुद्ध न्यायालयात जाण्याचा अधिकार देतात. स्टेट किंवा सरकार म्हणजे काय त्याची व्याख्या कलम 12 मध्ये केलेली आहे. ती अत्यंत व्यापक आहे. आपण ज्या अर्थाने सरकार समजतो त्या अर्थाने ती व्याख्या नाही. पार्लमेंट म्हणजे सुद्धा स्टेट. राजाचे सरकार सुद्धा त्यामध्ये येते. केंद्रीय मंत्रिमंडळ, केंद्रीय सरकार हे सुद्धा त्यामध्ये समाविष्ट आहे. महानगरपालिका, आणि ग्रामपंचायती सुद्धा त्यामध्ये समाविष्ट आहेत. आणि या पाचच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या नियंत्रणाखाली असतील अशा सर्व संस्थाही आहेत. यांच्यापैकी जर कोणी माझा मूलभूत हक्क नाकारला, माझ्या मुलभूत हक्काचा संकोच केला तर त्यांच्या विरोधात मला उच्च न्यायालयात जाता येते. समजा एखादा नागरिक काही कामानिमित्त पोलीस ठाण्यात गेला आणि पोलिसांनी त्याला डांबून ठेवले तर दाद कोठे मागायची? त्यासाठी मूलभूत हक्कांमध्ये या सर्व सरकारी यंत्रणांचा समावेश करण्यात आला आहे. त्या अधिकाराचे रक्षण करण्यासाठी मी न्याय संस्थेकडे जाईल आणखी कोणत्या अधिकाऱ्यांकडे जाईन. हे कलम 12 आपल्याला सांगते की मूलभूत हक्क म्हणजे काय आणि ते कोणाच्या विरोधात आपल्याला उपलब्ध आहेत.

# ऐका, पुरुषांनाही त्रास होतोय!

## एका वर्षात ३०० पुरुषांच्या तक्रारी, 'राष्ट्रीय पुरुष आयोग' स्थापन करण्याची पुरूष हक्क समितीची मागणी


पुणे बार अँड बेंच टीम
punebarandbench@gmail.com

पुण्यातील, 'पुरुष हक्क संरक्षण समिती' संस्थेकडे गेल्या एका वर्षात सुमारे ३०० पुरुषांनी आपल्या समस्यांची नोंद केली आहे. समाजात विवाहित पुरुषांनाही पत्नीकडून किंवा सासरच्या लोकांकडून मोठ्या प्रमाणात त्रास दिला जात असल्याचे या निमित्ताने अधोरेखित झाले आहे.

या तक्रारींमध्ये मुख्यत्वे नवरा-बायकोमधील भांडणे आणि कौटुंबिक तणावाचे विषय आहेत. पण अनेक पुरुषांनी अशी तक्रार केली आहे की, महिलांच्या सुरक्षेसाठी बनवलेले कायदे, जसे की हुंड्याबद्दलचा कायदा (कलम ४९८-अ), यांचा त्यांच्या पत्नीकडून किंवा सासरच्या मंडळींकडून गैरवापर केला जात आहे. म्हणजेच, खोटे आरोप लावून त्यांना त्रास दिला जात आहे. काही पुरुषांनी तर त्यांच्यावर बलात्काराचे खोटे गुन्हे दाखल केल्याचेही सांगितले आहे, ज्यामुळे त्यांचे आयुष्य खूप अडचणीत आले आहे.

### समिती काय मदत करते?

'पुरुष हक्क संरक्षण समिती' या पुरुषांना मानसिक आधार देते. ते त्यांचे म्हणणे ऐकून घेतात, त्यांना शांत करतात




आणि योग्य सल्ला देतात. कुटुंबात पुन्हा शांतता कशी येईल यासाठी प्रयत्न करतात आणि खोट्या आरोपांविरुद्ध लढण्यासाठी कायदेशीर माहिती पुरवतात.

पुण्याच्या पोलीस स्टेशनमधील 'भरोसा सेल' मध्येही अशा हजारो तक्रारी आल्या आहेत. यावरून हे सिद्ध होते की, पुरुषांना होणारा हा त्रास काही निवडक घटना नाही, तर तो एक मोठा सामाजिक प्रश्न आहे.

महिलांना न्याय मिळावा म्हणून जसा महिला आयोग आहे, तसाच पुरुषांच्या समस्या ऐकून घेण्यासाठी आणि त्यांना लवकर न्याय देण्यासाठी 'राष्ट्रीय पुरुष आयोग' (National Commission for Men) स्थापन करण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे.

थोडक्यात सांगायचे तर, महिलांप्रमाणेच पुरुषांच्या अडचणींकडेही गांभीर्याने पाहणे आणि त्यांनाही न्याय मिळवून देणे, हे आता खूप महत्त्वाचे झाले आहे.

एनसीआरबीच्या आकडेवारीनुसार, आत्महत्यांच्या एकूण घटनांमध्ये महाराष्ट्र हे नेहमीच देशात सर्वाधिक आत्महत्या नोंदवणाऱ्या पहिल्या तीन राज्यांपैकी एक राहिले आहे.

अलीकडच्या काही वर्षांत, विवाहित महिलांच्या तुलनेत विवाहित पुरुषांच्या आत्महत्यांचे प्रमाण अधिक असल्याचे दिसून आले आहे. एनसीआरबी अहवालानुसार विवाहित महिलांच्या तुलनेत विवाहित पुरुषांचे आत्महत्या करण्याचे प्रमाण १.६ पट जास्त होते. २०२२ मध्ये विवाह संबंधित समस्यांमुळे आत्महत्या करणाऱ्या पुरुषांची संख्या सुमारे ४,२३७ होती, तर महिलांची संख्या ३,९२६ होती. यावरून गेल्या काही वर्षांत विवाहित पुरुषांवरील मानसिक ताण वाढल्याचे दिसते.

# महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाचे काम ठप्प

## अध्यक्ष आणि सदस्यांच्या अनुपस्थितीमुळे आयोगाचे कामकाज थांबले, बाल हक्कांच्या उल्लंघनाच्या १,४३१ प्रकरणांवर कारवाई होण्यात अडथळा

पुणे बार अँड बेंच टीम
punebarandbench@gmail.com

महाराष्ट्रातील बाल हक्क संरक्षण आयोगाची (MSCPCR) अवस्था बिकट झाली आहे. मागील टीमचा कार्यकाळ ३ मे रोजी संपल्यानंतर आयोग पूर्णपणे रिकामा झाला आहे. अध्यक्ष आणि सहा सदस्य नसल्यामुळे आयोगाचे कामकाज ठप्प झाले आहे. एका RTI अर्जातून धक्कादायक माहिती समोर आली आहे की, प्रशासकीय कामांसाठी केवळ अधिकारीच उरले आहेत आणि तब्बल १,४३१ प्रकरणे प्रलंबित आहेत. यामुळे राज्यातील बाल हक्कांचे उल्लंघन रोखण्यात मोठी अडचण निर्माण झाली आहे.




माजी अध्यक्षा सुसीबेन शाह यांनी सांगितले की, आयोगाची बैठक घेण्यासाठी किंवा कोणताही आदेश देण्यासाठी किमान दोन सदस्यांची उपस्थिती आवश्यक आहे. 'बाल हक्क संरक्षण कायदा, २००० नुसार, तात्पुरते नियुक्त केलेले कोणतेही अधिकारी सुनावणी घेऊ शकत नाहीत किंवा आदेश देऊ शकत नाहीत,' असे त्या म्हणाल्या.

माजी सचिव लक्ष्मण राऊत यांनी सांगितले की, या पदांवर नियुक्तीसाठी तीन वेळा मंत्रीस्तरीय बैठका झाल्या आहेत, पण अद्याप कोणताही निर्णय झालेला नाही. यापूर्वीही २०१९-२२ दरम्यान या महत्त्वाच्या आयोगात पदे रिक्त होती. त्यावेळी शिक्षण कार्यकर्ते नितीन दळवी यांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. न्यायालयाने राज्य सरकारला सहा आठवड्यांच्या आत ही पदे भरण्याचे आदेश दिले होते. त्यानंतर मे २०२२ मध्ये सुसीबेन शाह यांची अध्यक्ष म्हणून आणि सहा सदस्यांची नियुक्ती करण्यात आली होती.

या विलंबामुळे बाल हक्कांचे संरक्षण करणाऱ्या या महत्त्वाच्या संस्थेचे काम थांबले आहे. अधिकारी एकटेच प्रशासकीय कामे करत आहेत, पण कायदेशीर निर्णय घेण्यासाठी सदस्यांची गरज आहे. यामुळे अनेक बाल हक्कांच्या उल्लंघनाच्या प्रकरणांवर वेळेवर कारवाई होऊ शकत नाही. ही परिस्थिती चिंताजनक आहे आणि यावर तातडीने तोडगा काढण्याची गरज आहे.

# आयत्या घरात घरोबा! लोणावळ्यातील बंगल्यातून तब्बल 22 वर्षांनी भाडेकरूला हायकोर्टाने दाखवला बाहेरचा रस्ता

## अपीलीय लवादाने 2002 मध्ये भाडेकरुला जागा रिकामी करण्याचे दिले होते आदेश

पुणे बार अँड बेंच टीम
punebarandbench@gmail.com

मुंबईची हवा मानवत नाही म्हणून लोणावळ्यातील बंगला खाली न करणाऱ्या भाडेकरूला हायकोर्टानं तब्बल 22 वर्षांनी बाहेरचा रस्ता दाखवलाय. अपीलीय लवादानं साल 2002 मध्ये या भाडेकरुला जागा रिकामी करण्याचे आदेश दिले होते. त्याविरोधात हायकोर्टात दाद मागत भाडेकरूनं साल 2003 मध्ये याचिका दाखल करत, जागा रिकामी करण्याच्या आदेशावर अंतरिम स्थगिती मिळवली होती. अखेर या याचिकेवर तब्बल 22 वर्षांनी मुंबई उच्च न्यायालयानं आपला अंतिम निकाल दिलाय.

### काय आहे प्रकरण?

लोणावळ्यातील एका बंगल्यातील काही खोल्या मालकानं मुंबईत राहणाऱ्या व्यक्तीला भाड्यावर दिल्या होत्या. भाडेकरू इथं कायम वास्तव्यास नसतो, कधी तरी तो इथं वास्तव्यास येतो. तेव्हा त्याला ही जागा रिकामी करण्याचे आदेश द्यावेत, अशी मालकाची मागणी होती.

### भाडेकरूचा दावा काय?

मुंबईची हवा आपल्या आरोग्याला मानवत नाही. त्यामुळे आपण केवळ आरामाला या बंगल्यात येतो. ही जागा रिकामी केल्यास लोणावळ्यात अन्य ठिकाणी असं घर मिळणं शक्य नाही.



आपण इथं अधूनमधून कधी तरी वास्तव्यास येऊ, असं आपण मालकाला आधीपासूनच कळवलं होतं. त्यामुळे जागा रिकामी करण्याबाबत दाखल झालेलं मालकाचं अपील रद्द करावं, अशी मागणी या भाडेकरूनं कोर्टाकडे केली होती.

### मालकाचा दावा काय?

मुळात हा भाडेकरू इथं कायम वास्तत्वास राहत नाही. आपलं कुटुंब फार मोठं आहे, आम्हाला आता आमची राहती जागा पुरत नाही. त्यामुळे आपली जागा आपल्याला परत हवीय, त्याकरिता ही जागा रिकामी करण्याचे आदेश भाडेकरूला द्यावेत, अशी मागणी अपील न्यायालयात करण्यात आली होती, जी मान्य करत अपील न्यायालयानं ही जागा रिकामी करण्याचे आदेश भाडेकरूला दिलेले आहेत. त्यामुळे त्यावर हायकोर्टानं लावलेली स्थगिती रद्द करावी, अशी मागणी याचिकेद्वारे कोर्टाकडे करण्यात आली होती.

### हायकोर्टाचा निकाल काय?

या याचिकेवर न्यायमूर्ती मिलिंद साठे यांच्या एकलपीठासमोर सुनावणी झाली. ज्यात जागा अडवून ठेवण्यासाठी भाडेकरूनं कोर्टापुढे विविध कारणं दिली. आपल्याला कमी रक्तदाबाचा त्रास आहे. त्यामुळे आरामासाठी आपण मुंबईहून लोणावळ्याला जातो, असा अजब दावाही त्यानं केला होता. मात्र या दाव्यात काहीही तथ्य नाही, कमी रक्तदाबाचा त्रास असलेली व्यक्ती तो कमी करण्यासाठी मुंबई ते लोणावळा प्रवास करू शकते?, असा सवाल उपस्थित करत हायकोर्टानं या भाडेकरूला ही जागा रिकामी करण्यासाठी सहा आठवड्यांची मुदत दिलीय.

# तीन मुलांचा बाप; ग्रामपंचायत सदस्यपद रद्द!

## तीन अपत्ये असतानाही ग्रामपंचायत सदस्यपदावर कार्यरत, पुणे जिल्हाधिकाऱ्यांची कारवाई

पुणे बार अँड बेंच टीम
punebarandbench@gmail.com

हवेली तालुक्यातील बकोरी ग्रामपंचायतीचे सदस्य संतोष राणबा वारघडे यांचे सदस्यत्व पुणे जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांनी रद्द केले आहे. 'महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५९' च्या कलम १४(१)(जे-१) नुसार ही कारवाई करण्यात आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, वारघडे हे दोनपेक्षा जास्त अपत्ये (तीन अपत्ये) असतानाही ग्रामपंचायत सदस्यपदावर कार्यरत होते, तसेच त्यांच्यावर जातपडताळणी न करता निवडणूक लढवल्याचाही आरोप होता. या गंभीर आरोपांमुळे त्यांच्यावर अपात्रतेची कारवाई करण्यात आली आहे.

स्थानिक नागरिक रामराव तुळशीराम कुटे यांनी जिल्हाधिकारी यांच्या न्यायालयात 'महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५९' च्या कलम १४(१)(जे-१) नुसार अपात्रतेचा वाद अर्ज दाखल केला होता. वारघडे हे दोनपेक्षा जास्त अपत्ये (तीन अपत्ये) असतानाही ग्रामपंचायत सदस्यपदावर कार्यरत होते, तसेच त्यांच्यावर जातपडताळणी प्रमाणपत्र नसताना राखीव जागेवरून निवडणूक लढवल्याचाही आरोप तक्रारीत नमूद करण्यात आला होता.

या प्रकरणाची सुनावणी पूर्ण झाल्यावर जिल्हाधिकारी, पुणे यांच्या न्यायालयाने ११ नोव्हेंबर २०२५ रोजी वारघडे यांचे सदस्यपद रद्द करण्याचा निर्णय दिला. महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५९ मधील कलम १४(१)(जे-१) स्पष्टपणे सांगते की, १२ सप्टेंबर २००१ नंतर ज्या व्यक्तींना दोनपेक्षा अधिक अपत्ये असतील, ती व्यक्ती ग्रामपंचायतीची निवडणूक लढवण्यासाठी किंवा सदस्य म्हणून राहण्यासाठी अपात्र ठरते; हा नियम राज्याच्या कुटुंब कल्याण धोरणाचा एक भाग आहे.

### कायदा काय सांगतो?

सदस्याचे पद रद्द करण्यामागे असलेले प्रमुख कायदेशीर कारण 'दोन अपत्यांचा नियम' हे आहे, जे महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५९ मध्ये नमूद आहे.

- **कलम १४(१)(जे-१):** या कलमानुसार, ज्या व्यक्तीला दोनपेक्षा अधिक अपत्ये आहेत, ती व्यक्ती ग्रामपंचायतीची निवडणूक लढवण्यासाठी किंवा सदस्य म्हणून राहण्यासाठी अपात्र ठरते. (कट-ऑफ डेटनंतर तिसरे अपत्य जन्माला आल्यास हा नियम लागू होतो. कट-ऑफ डेट ही १२ सप्टेंबर २००१ आहे).
- **या नियमाचा उद्देश:** हा नियम राज्याच्या कुटुंब कल्याण धोरणाशी सुसंगत आहे, ज्याचा मुख्य उद्देश लोकसंख्या वाढीवर नियंत्रण आणणे आणि लहान कुटुंबांना प्रोत्साहन देणे आहे.




पदच्युत सदस्य संतोष वारघडे

न्यायालयाने दिलेल्या मागील निर्णयानुसार 'दोन अपत्यांचा नियम' लागू करताना अपत्यांचा जन्म झाला आहे की नाही, यावर भर दिला जातो; ते अपत्य 'जिवंत' आहे की नाही, या शब्दाचा उल्लेख कायद्यात नाही.

सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत वारघडे या संदर्भात म्हणाले, 'जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेला हा निर्णय कायद्याचे राज्य प्रस्थापित करणारा आहे. ग्रामपंचायतीसारख्या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये काम करणाऱ्या लोकप्रतिनिधींनी कायद्याचे पालन करणे अत्यावश्यक आहे. दोन अपत्यांचा नियम हा जनहित आणि कुटुंब नियोजनाच्या धोरणाशी जोडलेला आहे. जर एखादा लोकप्रतिनिधी कायद्याचे उल्लंघन करत असेल, तर त्याच्यावर निश्चितच कारवाई झाली पाहिजे. जातपडताळणी प्रमाणपत्राशिवाय निवडणूक लढवणे ही देखील गंभीर बाब असून ती लोकप्रतिनिधित्व कायद्याचे उल्लंघन आहे. या निर्णयामुळे भविष्यात निवडणूक लढवणाऱ्या सर्व उमेदवारांना कायद्याचे गांभीर्य लक्षात येईल.'

दरम्यान हे प्रकरण जातपडताळणी न केल्याच्या कारणास्तव देखील अपात्र ठरवले गेले आहे, कारण कायद्यानुसार राखीव जागेसाठी निवडणूक लढवणाऱ्या उमेदवाराला आवश्यक असलेले जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक असते.

# साक्षीदार फितूर; तरीही वैज्ञानिक पुराव्यांवरून आरोपीला शिक्षा

## अल्पवयीन मुलीवर बलात्कार करणाऱ्याला २० वर्षांची सक्तमजुरी

पुणे बार अँड बेंच टीम
punebarandbench@gmail.com

अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार करणाऱ्याला न्यायालयाने २० वर्षांची सक्तमजुरी आणि २५ हजार रुपयांच्या दंडाची शिक्षा सुनावली. न्यायाधीश के. डी. शिर्भाते यांनी हा निकाल दिला दिला. खटल्यादरम्यान काही साक्षीदार फितूर झाले तरी वैज्ञानिक पुराव्यांवरून न्यायालयाने आरोपीचा दोष सिद्ध केला.

महेश दत्तात्रेय गोरेडे (वय २५, रा. येवलेवस्ती, पिंपळवाडी, ता. शिरूर, जि. पुणे) असे गुन्हेगाराचे नाव आहे. हा प्रकार खेड तालुक्यातील जेरेवाडी फाटा परिसरात २०२० मध्ये घडला होता.

फिरायला जाण्याचा बहाणा करून आरोपीने अल्पवयीन मुलीला लॉजवर नेले आणि तिच्यावर अत्याचार केला. या अत्याचारातून ती गर्भवती राहिल्यानंतर हा प्रकार उघडकीस आला. मुलीच्या आईने शिक्रापूर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली होती.



या खटल्यात सरकारी वकील ॲड. नितीन कोंघे यांनी सरकारतर्फे युक्तिवाद केला. या प्रकरणात डीएनए अहवाल महत्त्वाचा पुरावा ठरला.

खटल्यादरम्यान काही साक्षीदार फितूर झाले तरी वैज्ञानिक पुराव्यांवरून न्यायालयाने आरोपीचा दोष सिद्ध केला. दंड न भरल्यास सहा महिने जादा कारावास भोगावा लागेल, असे आदेशात नमूद आहे.

# 'सहायक धर्मादाय'साठी वकिलीचा अनुभव अनिवार्य

## 'महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था'मध्ये सुधारणा, राज्य मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय

पुणे बार अँड बेंच टीम
punebarandbench@gmail.com

सहायक धर्मादाय आयुक्त, गट-अ संवर्गातील पदांसाठी तीन वर्षे वकिलीचा अनुभव असणे यापुढे अनिवार्य असणार आहे. त्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० मध्ये सुधारणा करण्यास मंगळवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. सर्वोच्च न्यायालयाने एका न्यायालयीन प्रकरणात दिवाणी न्यायधीश (कनिष्ठ स्तर), प्रथम स्तर न्यायदंडाधिकारी या पदांवर अनुभव नसलेल्या विधी पदवीधरांना केवळ पदवीच्या आधारे नियुक्ती देण्यास अपात्र ठरविले आहे.

त्या अनुषंगाने सहायक धर्मादाय आयुक्त, गट-अ सहायक धर्मादाय आयुक्तांच्या अर्धन्यायिक स्वरूपाच्या आहेत. यामुळे केवळ पुस्तकी ज्ञानार्जन करून हाताळण्याऐवजी गुणवत्ता व संवेदनाशीलता प्राप्त होत नाही. त्यांच्या प्रत्येक कृतीवरून पक्षकारांशी संपर्क, न्यायदानाच्या प्रक्रियेत सहभाग आवश्यक आहे. यासाठी अनुभव अनिवार्य करण्याचा निर्णय घेण्यात आला. यामुळे शासनास अनुभवो आणि चांगल्या दर्जाच्या अधिकाऱ्यांस मिळतील. न्यायदानाच्या प्रक्रियेसाठी स लाभ लाभदायक ठरतील, याच लाभ पक्षकार, विश्वस्त व नागरिकांना होणार आहे.




### शब्दरचना बदलण्यास मान्यता

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार, महाराष्ट्र भिक्षा प्रतिबंध कायद्यातील मानापमानकारक शब्द वगळण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. त्यानुसार 'महापौरने पीडित, कुष्ठरोगी, खुळ्याने असे शब्द वगळण्यास व त्या अनुषंगाने अधिनियम सुधारणा करण्यास मान्यता देण्यात आली. एका याचिकेवरील निर्णयात सर्वोच्च न्यायालयाने राज्यातील सर्व अधिनियम, नियम, नियमावली, उपविधी इत्यादींमधील मानापमानकारक असे शब्द बदलण्याचे आदेश दिले आहेत. त्यावर मुंबई भिक्षा प्रतिबंध अधिनियम, १९५९मधील कलम नऊ व १९मध्ये सुधारणा करण्याची शिफारस विधी व न्याय विभागाने केली आहे.

# एका प्रेमळ बापाला निर्दोष मुक्त करणारी माझी पहिली न्यायालयीन लढाई

## दुर्धर आजाराने ग्रस्त मुलीने केली आत्महत्या, मात्र पोलिसांनी गोवले बापालाच छळाच्या गुन्ह्यांत

**माझा पहिला खटला**







ॲड. अय्यूब पठाण

> माझा युक्तिवाद पितृत्वाच्या भावनेवर आणि पुराव्यावर आधारित होता. 'एवढी काळजी घेणारा पिता आपल्या मुलीचा छळ किंवा तिला आत्महत्येस प्रवृत्त कशाला करेल?' मुलीने दुर्धर आजारामुळे आलेल्या नैराश्यातून हे पाऊल उचलले होते आणि वडिलांवर लावलेली क्रौर्य व आत्महत्येस प्रवृत्त करण्याची कलमे पूर्णतः चुकीची असल्याचे मी सिद्ध केले. या माझ्या पहिल्याच युक्तिवादावर कोर्टाने पित्याला निर्दोष मुक्त केले.

पुण्यात सिंबायोसिस विधी महाविद्यालय सुरू होऊन काहीच वर्षे झाली होती. मी १९९२ मध्ये त्या महाविद्यालयातून एलएलबीची पदवी (पाचवी बॅच) उत्तीर्ण झालो. ऑगस्ट १९९२ मध्ये सनद मिळाल्यानंतर मी ॲड. विजय सराफ यांच्याकडे कार्यानुभव घेतला. मात्र, याआधीपासूनच शिवाजीनगर कोर्टात जाऊन वकिलीच्या खाणाखुणा शिकायला सुरुवात केली होती. १९९३ मध्ये मी स्वतःचे फौजदारी खटले स्वतंत्रपणे चालवण्यास सज्ज झालो.

वकिलीच्या सुरुवातीलाच मला एक खासगी खटला मिळाला. हा खटला ४९८ (विवाहितेचा छळ) आणि ३०६ (आत्महत्येस प्रवृत्त करणे) या गंभीर कलमांखालील होता. पुण्यात घडलेल्या या प्रकरणात आरोपी कोणी तिसरा नसून, आत्महत्या केलेल्या मुलीचा चक्क तिचा पिताच होता. नवीन उमेदवारी असल्यामुळे मी प्रचंड अभ्यास केला आणि कायद्याच्या प्रत्येक पैलूचा कस लावत आरोपीची बाजू मांडण्याचे आव्हान स्वीकारले. हा खटला शिवाजीनगर न्यायालयात चालला.



फिर्यादी पक्षातर्फे अनुभवी आणि निष्णात वरिष्ठ सरकारी वकील तसेच खासगी वकील उभे होते. मात्र, अभ्यासातून माझ्यासमोर सत्य उलगडत गेले.

प्रकरणाची सत्य परिस्थिती अशी होती की, त्या मुलीला लग्नापूर्वीपासूनच एक दुर्धर आजार होता, जो बरा होत नव्हता. या आरोपी पित्याने आपल्या मुलीला बरे करण्यासाठी पुण्यातील त्या आजारातील बहुतेक सर्व तज्ज्ञ डॉक्टर पालथे घातले होते. मुंबईतील नामवंत डॉक्टरांची ट्रीटमेंटही तिच्या मृत्यूपर्यंत सुरू होती.

या मुलीला आजार असल्याचे लग्नानंतर वर्षभरात सासरच्या मंडळींना समजले होते. त्यानंतर ती माहेरी परतली. मृत्यूपूर्वी अगदी पंधरा दिवस आधीही तिला तीन दिवसांसाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. थोडक्यात, तिच्यावर अतिशय प्रेमळ आणि काळजी घेणाऱ्या वडिलांनी कोणताही छळ केला नव्हता. खरेतर, गेल्या ३-४ वर्षांत माहेरी तिला कोणताही त्रास झाला नव्हता, तशी नोंदही नव्हती.

माझा युक्तिवाद याच पितृत्वाच्या भावनेवर आणि पुराव्यावर आधारित होता. 'एवढी काळजी घेणारा पिता आपल्या मुलीचा छळ किंवा तिला आत्महत्येस प्रवृत्त कशाला करेल?' मुलीने दुर्धर आजारामुळे आलेल्या नैराश्यातून हे पाऊल उचलले होते आणि वडिलांवर लावलेली क्रौर्य व आत्महत्येस प्रवृत्त करण्याची कलमे पूर्णतः चुकीची असल्याचे मी सिद्ध केले.

या माझ्या पहिल्याच युक्तिवादावर कोर्टाने पित्याला निर्दोष मुक्त केले. १९९९ ते २००० दरम्यानचा हा खटला माझ्यासाठी अविस्मरणीय ठरला.

### सीआयडी आणि सीबीआय पर्यंतचा प्रवास

पहिल्या खटल्यातील यशानंतर फौजदारी खटल्यांमध्ये माझा जम बसला. २००६ नंतर महाराष्ट्र राज्य गुन्हे अन्वेषण विभागाचा ('सीआयडी'चा) कायदेशीर सल्लागार म्हणून माझी नियुक्ती झाली. चार-पाच वर्षे हे काम पाहिल्यानंतर, २०१० मध्ये केंद्र सरकारच्या केंद्रीय गुप्तचर विभाग ('सीबीआय'चा) विशेष सरकारी वकील म्हणून माझी नियुक्ती झाली.

सध्या मी महाराष्ट्र पोलीस अकादमीत मानद व्याख्याता म्हणून सेवा देतो. कोल्हापूर विशेष महानिरीक्षक परिक्षेत्रासाठी अनेक ठिकाणी व्याख्याने दिली आहेत. विशेष म्हणजे, मी ज्या सिंबायोसिस विधी महाविद्यालयात शिकलो, तिथेच एलएलबी आणि एलएलएमच्या विद्यार्थ्यांसाठी व्याख्याने देतो.

महाराष्ट्र इंटेलिजन्स ॲकॅडमी आणि 'नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ बॅंकिंग मॅनेजमेंट' (NIBM) येथेही माझे मार्गदर्शन सुरू असते. NIBM ही भारतातील एकमेव संस्था आहे, जिथे बॅंक फ्रॉड (Bank Fraud) आणि डॉक्युमेंट्स अशा विषयांवर माझी व्याख्याने होतात. या व्याख्यानांतून मिळणारे मानधनाचे चेक मी पोलिसांच्या प्रशिक्षण संस्थांना अनेकदा देणगी म्हणून देतो. विशेष सांगायचं तर, सीबीआय अकादमीला मी एकदा शिकायला गेलो होतो आणि नंतर त्याच संस्थेत व्याख्यान देऊन येण्याचा मानही मिळवला.

### साहित्यिक वळण आणि कौटुंबिक वारसा

कॉलेज जीवनात मी कविताही करायचो. कवी आणि लेखक लक्ष्मीकांत तांबोळी यांच्या ओळखीमुळे माझ्या कविता त्यांनी वाचल्या आणि बऱ्याच सुधारल्या. तांबोळी यांच्या माध्यमातून 'प्रभात'चे तत्कालीन संपादक माधवराव खंडकर यांच्याशी माझे चांगले संबंध जुळले. माझ्या अनेक कविता प्रसिद्धही झाल्या. माझ्या १०० कवितांचे बाड अजूनही कुठेतरी पडून आहे. तांबोळी यांच्या सहकार्याने माझा कवितासंग्रह प्रकाशित करण्याचा प्रयत्न होता, पण वकिलीत लक्ष केंद्रित केल्याने तो मागे पडला.

माझे मूळ गाव लोणी, तालुका परांडा. माझी बोलीभाषा पूर्वी 'कुटं गेला रं?' अशा छापची होती. गावात मुस्लिमांची ४० घरे असली तरी तेथील वातावरण पूर्णपणे मराठी होते. आम्ही सारे सण एकत्र साजरे करायचो. पुण्यात येऊन ४० वर्षे झाली, त्यामुळे माझे मराठी सुधारले. मी सदाशिव पेठेत राहिलो असून, काही महिने संघाच्या शाखेत, नंतर अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे काम आणि त्यानंतर भारतीय जनता पक्षाचेही काम केले. पण १९९३ नंतर हे सर्व सोडून मी पूर्णपणे वकिलीला वाहून घेतले.

### माझ्या घराण्यातला पहिला वकील मीच!

आज माझ्या कुटुंबात आणि जवळच्या नात्यात ११ जण वकिलीच्या क्षेत्रात कार्यरत आहेत. यात माझा मुलगा, भावाचा मुलगा, बहिणीचा मुलगा, मामाचा मुलगा, सासरचे ३-४ नातेवाईक यांचा समावेश आहे. माझ्याकडे पाहूनच अनेकांनी या कायद्याच्या क्षेत्राची निवड केली, हे पाहून मला खूप समाधान वाटते.

...

# वकिलांना 'पॉश' कायदा लागू होणार?

## महिला वकिलांच्या सुरक्षिततेवर मोठा निर्णय लवकरच अपेक्षित!

**पुणे बार अँड बेंच टीम**
punebarandbench@gmail.com

कामाच्या ठिकाणी होणारा लैंगिक छळ रोखण्यासाठी असलेला पॉश कायदा देशातील वकिलांनाही पूर्णपणे लागू करावा की नाही, या अत्यंत महत्त्वाच्या प्रकरणावर आता सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारचे कायदा मंत्रालय आणि देशातील वकिलांची सर्वात मोठी संस्था बीसीआय यांना नोटीस पाठवून उत्तर मागवले आहे.

गेल्या काही दिवसांपासून मुंबई उच्च न्यायालयाच्या एका निर्णयामुळे या कायद्याच्या अंमलबजावणीवर प्रश्नचिन्ह उभे राहिले होते. उच्च न्यायालयाने निर्णय दिला होता की 'बार कौन्सिल' ही संस्था कायद्यानुसार 'कामाचे ठिकाण' या व्याख्येत बसत नाही. यामुळे, बार कौन्सिलमध्ये काम करणाऱ्या महिलांना आणि सदस्य असलेल्या वकिलांना लैंगिक छळाविरुद्ध कायद्याचे सरळ संरक्षण मिळत नव्हते. या निर्णयामुळे कायदेशीर क्षेत्रात मोठा असंतोष पसरला होता, कारण वकील अनेकदा न्यायालयीन कक्ष, वकिलांचे छोटे कार्यालय (चेंबर्स) किंवा वकिलांच्या संघटनांमध्ये काम करतात, जिथे संरक्षणाची नितांत गरज आहे.




याच निर्णयाला आव्हान देत सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली आहे. याचिकाकर्त्यांचे म्हणणे आहे की, कायदेशीर व्यवसायाची रचना ही इतर कॉर्पोरेट कामाच्या ठिकाणांपेक्षा वेगळी आहे आणि बार कौन्सिल ही वकिलांची नियमन करणारी सर्वोच्च संस्था असल्याने, तिला PoSH कायद्याच्या कक्षेत आणणे आवश्यक आहे. या कायद्याचे संरक्षण न मिळाल्यास, महिला वकिलांच्या मूलभूत मानवी हक्कांचे उल्लंघन होईल, अशी जोरदार बाजू मांडण्यात आली आहे.

हा वाद मिटवण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने आता थेट या प्रमुख संस्थांना नोटीस पाठवली आहे. न्यायालयाने हे प्रकरण किती गंभीरपणे घेतले आहे, हे यावरून दिसून येते की त्यांनी या प्रकरणात अॅटर्नी जनरल आणि सॉलिसिटर जनरल यांसारख्या सर्वोच्च विधी अधिकाऱ्यांचीही मदत घेण्याचा निर्णय घेतला आहे. या उच्च अधिकाऱ्यांचा सहभाग दर्शवतो की हे प्रकरण केवळ कायदेशीर नियमांपुरते मर्यादित नसून, ते संविधानाच्या दृष्टिकोनातून महिलांच्या समानतेच्या आणि सुरक्षिततेच्या हक्काशी जोडले गेलेले आहे.

▪ **परिणामः**

जर सर्वोच्च न्यायालयाने असा निर्णय दिला की वकिलांचे कामकाज हे 'कामाचे ठिकाण' या व्याख्येत येते, तर सगळ्या वकिलांवर बंधनः देशातील प्रत्येक महिला वकिलाला PoSH कायद्याचे पूर्ण संरक्षण मिळेल. शिस्त पाळावी लागणार, बार असोसिएशन आणि बार कौन्सिलसारख्या संघटनांना महिलांच्या तक्रारींवर PoSH कायद्यानुसार कार्यवाही करण्यासाठी योग्य यंत्रणा म्हणजेच अंतर्गत तक्रार निवारण समिती तातडीने तयार करावी लागेल.

या प्रकरणात केंद्र सरकार आणि बीसीआय काय उत्तर देतात, यावर कायदेशीर क्षेत्रात काम करणाऱ्या लाखो महिला वकिलांचे भविष्य अवलंबून असेल. सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय भारतातील कायदेशीर व्यवसायाच्या कामाच्या संस्कृतीला नवी दिशा देणारा ठरू शकतो.

# सेवानिवृत्त पोलिसाकडून लाच मागणाऱ्या विशेष सरकारी वकिलाला अटक

**पुणे बार अँड बेंच टीम**
punebarandbench@gmail.com

छत्रपती संभाजीनगर येथील जिल्हा व सत्र न्यायालयात कार्यरत असलेले विशेष सरकारी वकील शरद बन्सी बांगर यांना लाच मागितल्याच्या आरोपाखाली लाचलुचपत प्रतिबंधक विभाग (एसीबी) च्या जालना युनिटने अटक केली आहे.

एका सेवानिवृत्त सहायक उपनिरीक्षकाने (ASI) दाखल केलेल्या तक्रारीनुसार ही कारवाई करण्यात आली. तक्रारदार एएसआय हे त्यांच्यावरील एका लाचखोरीच्या खटल्यातून नुकतेच निर्दोष मुक्त झाले होते. या निर्दोष मुक्ततेविरुद्ध उच्च न्यायालयात अपील दाखल न करण्यासाठी वकील बांगर यांनी त्यांच्याकडे २ लाख रुपयांची लाच मागितली होती. तक्रारदाराने सुरुवातीला १.५ लाख रुपये दिले होते, परंतु उर्वरित रक्कम देण्यासाठी बांगर यांच्याकडून वारंवार तगादा लावण्यात आल्यामुळे अखेरीस त्यांनी एसीबीकडे धाव घेतली. एसीबीने सापळा रचला, परंतु बांगर यांनी कारवाईचा संशय आल्यामुळे लाचेची रक्कम स्वीकारणे टाळले.

अखेरीस, एसीबीच्या अधिकाऱ्यांनी त्यांना बुधवारी (१९ नोव्हेंबर २०२५) न्यायालयाच्या आवारातून अटक केली. या प्रकरणाची सखोल चौकशी सुरू असून, त्यांनी इतर प्रकरणांमध्येही अशा मागण्या केल्या आहेत का, याचा तपास एसीबी करत आहे.

# कुणी एकटा फ्लॅटमालक पुनर्विकास रोखू शकत नाही

## बोरिवलीतील सोसायटी प्रकरणी अडथळा आणणाऱ्या फ्लॅट मालकाला मुंबई उच्च न्यायालयाने फटकारले

**पुणे बार अँड बेंच टीम**
punebarandbench@gmail.com

मं बोरिवलीतील एका जीर्ण इमारतीच्या पुनर्विकासात अडथळा आणणाऱ्या फ्लॅट मालकाला मुंबई उच्च न्यायालयाने फटकारले. बहुसंख्य रहिवाशांनी मंजूर केलेल्या पुनर्विकास प्रकल्पात एकटा असहमत फ्लॅटमालक खो घालू शकत नाही, अर्थात एकटा फ्लॅटमालक इमारतीचा पुनर्विकास रोखू शकत नाही, असा महत्त्वपूर्ण निर्वाळा मुख्य न्यायमूर्ती चंद्रशेखर आणि न्यायमूर्ती गौतम अंखड यांच्या खंडपीठाने दिला.

पुनर्विकासाबाबत बहुमताचे निर्णय वैयक्तिक सदस्यांना बंधनकारक असतात. जेव्हा इतर प्रत्येक रहिवाशाने आपला फ्लॅट रिकामा केला असेल आणि विकासक सतत ट्रान्झिट रेंट देत असेल, तेव्हा एक असहकार सदस्य उर्वरित सोसायटीला ओलीस ठेवू शकत नाही, असे खंडपीठाने स्पष्ट केले.

बोरिवली येथील अमिता सहकारी गृहनिर्माण संस्थेशी संबंधित हे प्रकरण असून उच्च न्यायालयाच्या द्विसदस्यीय खंडपीठापुढे सुनावणी झाली. अमिता सहकारी गृहनिर्माण संस्थेची इमारत 1980 च्या दशकात बांधण्यात आली होती. 2021 मध्ये ती धोकादायक घोषित करण्यात आली होती. नंतर सोसायटीने पुनर्विकासासाठी निविदा मागवल्या. त्यावेळी असहमत असलेल्या फ्लॅटमालकाच्या राजेंद्र बिल्डर्स या विकासक कंपनीनेदेखील प्रस्ताव सादर केला. परंतु तो प्रस्ताव सोसायटीकडून नाकारण्यात आला आणि इमारतीचा पुनर्विकास करण्यासाठी बालाजी पद्मावती डेव्हलपरची नियुक्ती करण्यात आली. त्यानंतर मे 2025 मध्ये एक विकास करार करण्यात आला.

तो पुनर्विकासाला तयार नसलेल्या फ्लॅट मालकासह सर्व सदस्यांना बंधनकारक होता. विकासकाला जानेवारी 2025 मध्ये पालिका प्रशासनाकडून आयओडीसह इतर प्रमुख मंजुरी मिळाल्या. त्यामुळे पुनर्विकास मार्गी लागल्यानंतर असहमत फ्लॅटमालक वगळता इतर सर्व सदस्यांनी त्यांचे फ्लॅट रिकामे केले आणि कायमस्वरूपी पर्यायी निवास करारांवर स्वाक्षरी केली. मात्र असहमत फ्लॅटमालकाने पुनर्विकासासाठी आपल्या फ्लॅटचा ताबा देण्यास नकार दिला. त्यामुळे पुनर्विकास रखडला गेल्याने सोसायटीने कायदेशीर लढाई सुरू केली होती.



# न्यायाचा केवळ देखावा, सत्य विदारक!

## न्यायदान करणे हे त्यांचे मूळ काम असले तरी, न्यायाधीश गुरफटले कॉन्फरन्सेस, मीटिंग्ज, वरिष्ठ अधिकाऱ्यांची तयारी आणि लीगल एड आकडेवारीत

**ॲड. सुप्रिया कोठारी**

'सर्वांसाठी न्याय' आणि 'कायदा सर्वांसाठी समान' या गोष्टी म्हणजे आजच्या काळात केवळ एक देखावा आहेत, एक फुगा आहे. तो फुगा फोडल्यानंतर जे वास्तव समोर येते, ते अत्यंत विदारक आहे. माझ्या वकिलीच्या अनुभवात मी पाहिले आहे की अगदी छोट्या-छोट्या गोष्टींसाठीही पक्षकारांना कोर्टात हेलपाटे मारावे लागतात आणि यात त्यांचा वेळ, पैसा आणि मानसिक शांतता खर्च होते. आपल्याविरुद्ध केस झाल्याची माहिती नसलेल्या एखाद्या ज्येष्ठ नागरिकाला माहिती घेण्यासाठी कोर्टात आल्यावर हाकलून दिले जाते, आणि त्याला जिल्हा न्यायाधीशांकडे अर्ज करावा लागतो. ही फार वाईट गोष्ट आहे. दिवाणी असो वा फौजदारी, दोन्ही ठिकाणी हीच परिस्थिती आहे. फौजदारी खटल्यात, ॲन्टीसिपेटरी बेलसाठी दोन-दोन महिने तारखा दिल्या जातात, त्यामुळे पक्षकाराला अटक होण्याची वेळ येते.

लोक अदालतीचे उदाहरण घ्या. तिथे इतक्या खटल्यांमध्ये तडजोड झाली, अमूक रकमेची वसुली झाली, असे सांगितले जाते. पण टॅक्स किंवा पाणीपट्टी गोळा करणे हे न्यायव्यवस्थेचे काम आहे का? वसुली १०० कोटींची दाखवतात, पण मूळ न्याय खऱ्या अर्थाने कोणाला मिळाला, याची टक्केवारी माझ्याकडे किंवा कोणाकडेच नाही. ही माहिती मुद्दाम पुढे आणली जात नाही. मी स्वतः अनेक वेळा जिथे कमतरता आहे, त्याबद्दल उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयाला निवेदन पाठवले आहे. स्टाफची वागणूक आणि ज्येष्ठ नागरिकांना मिळणारी वागणूक याबद्दल लेखी तक्रार केली आहे, मात्र त्याचा परिणाम शून्य आहे.




शिक्षक जसे जनगणना किंवा मतदान आदी कामांमध्ये गुरफटलेले असतात, तसे आज न्यायाधीशांचे झाले आहे. न्यायदान करणे हे त्यांचे मूळ काम असले तरी, कॉन्फरन्सेस, मीटिंग्ज, वरिष्ठ अधिकाऱ्यांची तयारी, आणि लिगल एड रिकव्हरीची आकडेवारी यामध्ये त्यांचा बहुतांश वेळ जातो. त्यामुळे मूळ न्यायदानाच्या कामात खूप विलंब होत चाललेला आहे. आता खटल्याच्या 'गुणवत्तेला' (मेरिट) खूप कमी महत्त्व राहिले आहे. आम्ही दोन तास अभ्यास करून युक्तिवाद करायला गेलो, तरी त्यांना त्यात रस नसतो. कधीकधी न्यायाधीशांनाच काही समजत नाही. पूर्वी न्यायाव्यवस्थेसाठी वाहून घेतलेले लोक होते, तसे आता राहिले नाहीत; अनेकांना फक्त पगाराशी देणेघेणे आहे. याचा शंभर टक्के परिणाम पक्षकारांना भोगावा लागतो.

न्यायव्यवस्थेतील अंतर्गत गोंधळामुळे पक्षकारांचा किती त्रास होतो हे कोणी लक्षात घेत नाही. नुकतेच आम्हाला समजले की पिंपरी न्यायालयातील केस शिवाजीनगर न्यायालयात ट्रान्स्फर झाले आहेत आणि त्यामुळे ते चालवत नाहीत. दूर रत्नागिरी किंवा मुंबईवरून लोक येतात, पिंपरी न्यायालयात चौकशी करतात, तेव्हा त्यांना समजते की कोर्टाची तयारी नाही. मग ते खटले का थांबवले जातात? पर्यायी व्यवस्था आधी केली पाहिजे. क्लार्क मंडळी सांगतात की, 'आमच्यावर कामाचा खूप बोजा आहे.' आम्ही भांडलो तर ते डोळ्यांवर येतात. क्लार्क त्यांच्या हितसंबंधातील लोकांना सकाळीच तारखा देतात आणि न्यायाधीशांना विचारले तर ते म्हणतात, 'आमच्याकडे तीन न्यायालयांचा चार्ज आहे, आम्ही काय करणार?' न्यायव्यवस्था आता अर्थकारणाकडे जास्त पाहत आहे, कुणालाही काम करण्यात फारसा रस राहिलेला नाही.

कर्मचारी वर्ग काम करत नाही. पूर्वीचे कर्मचारी इतके चांगले होते की आमच्यासारख्या नवोदित वकिलांना त्यांच्याकडून बरेच काही शिकायला मिळाले. आता आलेले नवीन कर्मचारी कायद्याची माहिती नसलेले आणि उद्धट बोलणारे आहेत. यामुळे न्यायव्यवस्थेची साखळी बाधित होते. पूर्वी न्यायाधीशांचा एक दबदबा असायचा, ते सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये मिसळत नसत. आता कोणीही कुठेही जाते, काहीही बोलते. अभ्यास करून तयार केलेल्या युक्तिवादाला किंमत राहिलेली नाही. पोटगीच्या केसमध्ये आम्ही कायदेशीर बाजू सांगत असताना, न्यायाधीश थेट प्रतिवादीला विचारतात, 'तुम्ही किती पोटगी देणार?' किंवा महिलेला विचारतात, 'तुम्ही किती पैसे घेणार?' कायदेशीर तरतुदी, अडचणी आणि परिस्थिती कोणी विचारात घेत नाही. आता मानवतावादी दृष्टिकोन बाजूला गेला असून फक्त महिन्याचा कोटा आणि किती निकाल द्यायचे, यावरच लक्ष दिले जाते. कौटुंबिक प्रकरणांना तर दुय्यम दर्जा दिला जातो.

या सगळ्या परिस्थितीत, कौटुंबिक न्यायालयाचे कामकाज मात्र बऱ्यापैकी सुरू आहे. तिथे कर्मचारी वर्ग सक्रिय असतो, रोजनामे व्यवस्थित ठेवले जातात. लोकन्यायालयात जाण्यासाठी ते फार आग्रही नसतात. मला वेळेवर फाईल पाहायला मिळते आणि नोटिसा पाठवण्यासाठी वकिलांना धडपड करावी लागत नाही. माझा अनुभव दिवाणी, फौजदारी आणि कौटुंबिक अशा तिन्ही खटल्यांचा असल्याने, मला हा फरक स्पष्ट दिसतो. जर वकील, न्यायाधीश, कर्मचारी आणि पोलीस या साखळीने एकसंधपणे काम केले, तरच खटल्यांना वेळ लागणार नाही आणि पक्षकारांचा वेळ आणि पैसा वाया जाणार नाही.

> 'आता खटल्याच्या 'गुणवत्तेला' (मेरिट) खूप कमी महत्त्व राहिले आहे. आम्ही दोन तास अभ्यास करून युक्तिवाद करायला गेलो, तरी त्यांना त्यात रस नसतो. कधीकधी न्यायाधीशांनाच काही समजत नाही. पूर्वी न्यायाव्यवस्थेसाठी वाहून घेतलेले लोक होते, तसे आता राहिले नाहीत; अनेकांना फक्त पगाराशी देणेघेणे आहे. याचा शंभर टक्के परिणाम पक्षकारांना भोगावा लागतो.'



ॲड. सुप्रिया कोठारी

---

पुणे बार अँड बेंच टीम
punebarandbench@gmail.com

# देशातील 30 टक्के महिलांचा छळ

सन २०२३मध्ये भारतातील १५ ते ४९ वयोगटातील एक पंचमांशपेक्षा अधिक महिलांना जोडीदाराकडून छळ सहन करावा लागला. तर, जवळपास ३० टक्के महिला आयुष्यभर या हिंसाचाराचा सामना करतात, अशी धडकीदायक माहिती जागतिक आरोग्य संघटनेने जाहीर केलेल्या अहवालातून समोर आली आहे.

२५ नोव्हेंबर रोजी 'आंतरराष्ट्रीय महिला आणि मुलींवरील हिंसा निर्मूलन दिवस' साजरा केला जात आहे. त्यानिमित्ताने अहवालात ही माहिती नमूद केली आहे. १६८ देशांचा अभ्यास करणारा हा अहवाल सन २००० ते २०२३ दरम्यान केलेल्या सर्वेक्षण 'सर्वेसमावेशक आढावा' आहे. महिलांवरील हिंसा जागतिक स्तरावर व्यापक असून, सर्व्हेत 'सर्व्हेत आणि प्रदेशांमधील महिला याला बळी ठरतात', असे यातील अंदाज दर्शवतात, असे या अहवालाच्या लेखकांनी म्हटले आहे.

- आयुष्यभरात जवळपास प्रत्येकी तीनपैकी एक किंवा ८४ कोटी महिलांना आयुष्यभर जोडीदाराकडून किंवा लैंगिक छळाचा सामना करावा लागला. सन २००० पासून यात संख्यात फारसा बदल झालेला नाही.
- जगात १५ ते ४९ वयोगटातील सुमारे ८.४ टक्के महिलांना लैंगिक छळाचा सामना करावा लागला.
- भारतात १५ ते ४९ वयोगटातील ४ टक्के महिलांना लैंगिक छळाचा सामना करावा लागलाय, असा अंदाज.
- महिलांवरील हिंसाचार निर्मूलनात प्रगती खूप संथ असून सन २०३० पर्यंत महिला आणि मुलींवरील सर्व प्रकारच्या हिंसांचे निर्मूलन करण्याचे शाश्वत विकास साध्य करणे दूर राहिले आहे.
- महिलांवरील हिंसाचाराचे धोके वाढत असताना महिलांवरील हिंसा रोखण्याउद्देशाने राखून ठेवलेल्या निधीत घट.
- २०२२ मध्ये केवळ ०.२ टक्के निधी महिलांवरील हिंसा रोखण्यावर केंद्रित कार्यक्रमांसाठी वितरीत करण्यात आला. सन २०२५ मध्ये या निधीत आणखी घट.

> 'महिलांवरील हिंसा ही मानवतेची सर्वात जुन्या अन्यायांपैकी एक आहे. एखाद्या समाजाची अर्धी लोकसंख्या भीतीची छायखाली जगत असताना हा समाज स्वतःला न्याय्य, सुरक्षित किंवा निरोगी म्हणू शकत नाही. या हिंसाचे अंत करणे हा केवळ आरोग्याचा मुद्दा नाही; तो सन्मान, समानता आणि मानवी हक्कांचा मुद्दा आहे.
>
> **- डॉ. टेड्रॉस अधानोम घेब्रेयेसस,**
> महासंचालक, जागतिक आरोग्य संघटना

# सांभाळण्यास लेकाचा नकार, पाठवले तीन महिने जेलात

## ज्येष्ठ नागरिक व पालकांचे संरक्षण व कल्याण कायद्यांतर्गत दाखल करण्यात आला गुन्हा

पुणे बार अँड बेंच टीम
punebarandbench@gmail.com

मुलांना आईवडील लहानाचे मोठे करतात. आपल्या लेकरांना तळ हाताच्या फोडा प्रमाणे जपतात. त्यांना हवं नको ते देतात. त्यांचं शिक्षण, त्यांचे पालन पोषण, त्यांचं लग्न, अगदी त्यांची मुलं याचे ही लाड हेच आई बाप करत असतात. अशा आई वडिलांना वृद्धावस्थेत सांभाळण्याची जबाबदारी तशी त्यांच्या मुलांची असते. तेवढीच माफक आपेक्षा ते आई वडील करतात. पण ते ही काही मुल पूर्ण करतात. त्यांना आपलेच आई वडिल एक बोजं वाटतात. त्यांना ते नकोशे होतात. लहान पणी त्यांनी आपल्यासाठी काय केलं आहे याची विसर त्यांना पडतो. अशा स्थितीत ते माता पिता मात्र एकाकी पडलेले असतात. त्यांच्या जवळ असते ते दुखः आणि त्यांचे अश्रू. पण अशी वागणूक



आपल्याच आई वडिलांना देणाऱ्या मुलाला कोर्टाने चांगलाच दणका दिला आहे.

आई–वडिलांची सेवा ही नैतिकच नाही तर कायदेशीर जबाबदारीही आहे. हा संदेश अधोरेखित करणारा महत्त्वाचा निर्णय पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यातील नारायणगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीतून समोर आला आहे. ज्येष्ठ नागरिकांचा सांभाळ न करणाऱ्या मुलाला न्यायालयाने चांगलाच दणका दिला आहे. अशा नालायक मुलाला कोर्टाने तीन महिने सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली आहे. शिवाय पाच हजार रुपयांचा दंड ही ठोठावला आहे. जुन्नर मधील निमगाव सावा विठ्ठल बाबुराव गाडगे हे राहतात. त्यांचे वय हे ८० वर्षे आहे. त्यांना त्यांची दोन मुलं सांभाळत नव्हती. त्यामुळे त्यांनी आपल्या दोन मुलांविरुद्ध नारायणगाव पोलिसांकडे तक्रार केली होती.

तक्रारीनुसार, सप्टेंबर 2022 पासून ते मे 2025 पर्यंत दोन्ही मुलं वडिलांच्या घरात राहत होती. पण त्यावेळी ही दोन्ही मुलं त्यांचा आणि त्यांच्या पत्नीची कोणती ही काळजी घेत नव्हते. अन्न,औषध, देखभाल अशा कोणत्याच जबाबदाऱ्या त्यांनी पार पाडल्या नाही. त्यांनी आई वडीलांकडे दुर्लक्ष केले असे या तक्रारीत म्हटले होते. आपल्याच घरात त्या दोघांनाही परक्यासारखी वागणूक मिळत होती. त्यामुळे या वयातही ८० वर्षांच्या विठ्ठल यांनी आपल्या मुलांना अद्दल घडवण्याचे ठरवले. जेणे करून अन्य मुलंही त्यांच्या सारखं स्वतः च्या आई वडीलांना वाईट वागणूक देतील.

दरम्यान या प्रकरणी ज्येष्ठ नागरिक व पालकांचे संरक्षण व कल्याण अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. प्रकरणाचा तपास पोलीस हवालदार एस. एम. कोकणे यांनी काटेकोरपणे पूर्ण केला. त्यानंतर दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी अनंत बाजड यांनी सर्व पुराव्यांचा बारकाईने अभ्यास करून आरोपी लक्ष्मण विठ्ठल गाडगे यांना दोषी ठरवले. शिवाय त्याला शिक्षा ही जाहीर केली. हा निर्णय मुलांनी आई-वडिलांप्रती कर्तव्य विसरू नये याचा ठळक इशारा देणारा ठरला आहे. समाजातही या निकालाची चर्चा वाढली असून, "पालकांचा सांभाळ हा पर्याय नसून कर्तव्य आहे" हा संदेश पुन्हा अधोरेखित झाल्याची भावना व्यक्त होत आहे.

# विमाननगर वाढदिवस पार्टीत शस्त्रे

## उच्च न्यायालयाचा एफआयआर रद्द करण्यास नकार, 40 ते 50 तरुण 'स्कायमॅक्स'मध्ये जमले होते एकत्र

पुणे बार अँड बेंच टीम
punebarandbench@gmail.com

मुंबई उच्च न्यायालयाने एका पुणेकर नागरिकाविरुद्ध दाखल करण्यात आलेला प्रथम माहिती अहवाल (गुन्हा) रद्द करण्यास स्पष्ट नकार दिला आहे. या नागरिकाने एका वाढदिवसाच्या सोहळ्याला हजेरी लावली होती, जिथे 'गुन्हेगारी पार्श्वभूमीचे लोक' उपस्थित होते आणि त्या सोहळ्यातील लोक काठ्या व शस्त्रे कथितरित्या हातात घेऊन प्रदर्शन करत असल्याचा व्हिडिओ 'इन्स्टाग्राम'वर प्रसारित करण्यात आला होता.

मुख्य न्यायमूर्ती चंद्रशेखर आणि न्यायमूर्ती गौतम आमखाडे यांच्या खंडपीठाने १० नोव्हेंबर रोजी दिलेल्या निर्णयात म्हटले आहे की, "वरकरणी पाहता, समाज माध्यमांवर झालेले असे प्रदर्शन पाहणाऱ्यांच्या मनात भीती किंवा असुरक्षिततेची भावना निर्माण करू शकते. यामुळे जमलेल्या व्यक्तींच्या बळाची जाणीव होते."

### काय आहे प्रकरण?

तेजस गायकवाड (२३) याच्यावर पुणे येथील विमान नगर पोलिसांनी 'महाराष्ट्र शस्त्र अधिनियम', 'महाराष्ट्र पोलीस अधिनियम' आणि मोक्का (MCOCA) कायद्यांतर्गत गुन्हा नोंदवला आहे. ४ ऑगस्ट रोजी, 'गुन्हेगारी पार्श्वभूमीचे लोक' आणि सुमारे "४० ते ५० तरुण" स्कायमॅक्स इमारतीच्या तळघरात एकत्र जमले होते.

सरकारी वकील जयेश याज्ञिक यांनी



न्यायालयाला सांगितले की, फिरोज शेख याने निखिल कांबळेच्या वाढदिवसाची पार्टी आयोजित केली होती. ही सभा बेकायदेशीर होती. विपुल दुशिंग यांचे कायदेशीर सल्लागार असलेले तेजस गायकवाड यांनी वाढदिवसाच्या पार्टीला उपस्थिती दर्शविली म्हणून, केवळ त्यांचा गुन्हेगारी पूर्ववृत्ताचा अभाव त्यांना कायदेशीर कारवाईतून सूट देऊ शकत नाही.

दुशिंग यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या 'एफआयआर रद्द करण्याच्या' निकषांचा आधार घेतला होता. मात्र, न्यायाधीशांनी स्पष्ट केले की, निकष अशा प्रकरणांमध्ये लागू होत नाहीत, जिथे 'कृतीमध्ये शस्त्रे किंवा हिंसेचा धोका समाविष्ट असतो'.

न्यायालयाने निरीक्षण नोंदवले की, प्रथम माहिती अहवालात गुन्हेगारी पार्श्वभूमीच्या लोकांच्या नावांसह पार्टीचे विशिष्ट तपशील आहेत. 'तो एक साधा वाढदिवसाचा सोहळा असताना, इतक्या मोठ्या संख्येने लोकांनी प्रतिबंधित शस्त्रे घेऊन कायद्याचे उल्लंघन करण्याची गरज काय होती?' असा सवाल न्यायालयाने केला.

उच्च न्यायालयाने 'मोक्का' कायद्याच्या 'संघटित गुन्हेगारी' या व्याख्येचा स्वीकार केला नसला तरी, गायकवाड यांनी शस्त्रे बाळगली नसतील किंवा गुन्हेगारी कृतीत सक्रिय सहभाग घेतला नसेल, तरीही 'जेथे कृतीमध्ये शस्त्रे किंवा हिंसेचा धोका समाविष्ट आहे,' तेथे कायद्याची तरतूद लागू राहील, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

# 14 वर्षांपासून प्रलंबित 889 कुटुंबांना न्याय; ॲट्रोसिटी पीडित वारसांना सरकारी नोकरी

पुणे बार अँड बेंच टीम
punebarandbench@gmail.com



डॉ. हर्षदीप कांबळे
सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव

महाराष्ट्र शासनाने अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम (SC/ST Act) अंतर्गत गेल्या 14 वर्षांपासून प्रलंबित असलेल्या 889 मृत व्यक्तींच्या वारसांना सरकारी सेवेत सामावून घेण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय नुकताच जाहीर केला आहे. हा निर्णय सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे यांनी या संदर्भात माहिती दिली.

2011 ते 2025 या कालावधीत ॲट्रॉसिटीच्या घटनांमुळे मृत्यूमुखी पडलेल्या 889 नागरिकांच्या कुटुंबांना कायद्यानुसार सरकारी नोकरी मिळणे अपेक्षित होते. मात्र, विविध प्रशासकीय अडचणींमुळे ही प्रकरणे प्रदीर्घ काळ प्रलंबित राहिली. पीडित कुटुंबांनी, ज्यात प्रामुख्याने महार, मांग, चांभार, आदिवासी आणि इतर गरीब अत्याचारग्रस्त समाजाचा समावेश आहे, न्यायाच्या प्रतीक्षेत सरकारी कार्यालयांचे उंबरठे झिजवले.


सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव म्हणून डॉ. हर्षदीप कांबळे यांनी राज्यस्तरीय समितीची स्थापना करून प्रकरणांचा सखोल अभ्यास केला. धोरणात्मक कागदपत्रे तयार करून अंमलबजावणीचा स्पष्ट मार्ग निश्चित केला. निर्णय अंमलात आणण्यासाठी विविध सरकारी विभागांशी प्रभावीपणे समन्वय साधला. महाराष्ट्र शासनाच्या या निर्णयामुळे 889 कुटुंबांना दिलासा मिळाला आहे.

भारतीय समाजात पूर्वापार चालत आलेले जातीय भेदभाव आणि होणारे अत्याचार रोखण्यासाठी तसेच ऐतिहासिकदृष्ट्या मागासलेल्या अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीच्या या नागरिकांना सामाजिक समता व न्याय मिळवून देण्यासाठी ॲट्रॉसिटी कायदा बनवण्यात आला. सामान्य कायद्यांतर्गत (भारतीय दंड संहिता) या समुदायाला पुरेशा प्रमाणात संरक्षण मिळत नसल्याने, या कायद्याद्वारे अत्याचारांना कठोरपणे प्रतिबंध करण्यात आला आहे. या कायद्यामुळे जातीय अत्याचारांचे खटले चालवण्यासाठी विशेष न्यायालयांची स्थापना करण्याची तरतूद आहे आणि यात अटकपूर्व जामीन नाकारण्यासारख्या कठोर तरतुदी समाविष्ट आहेत, ज्यामुळे पिढ्यानपिढ्या होणाऱ्या छळास प्रभावीपणे पायबंद घालता येतो. या कायद्याचे उद्दिष्ट केवळ गुन्हेगारांना शिक्षा करणे नसून, अनुसूचित जाती/जमातीतील व्यक्तींचे सामाजिक, आर्थिक व राजकीय हक्क जपणे आणि त्यांना सन्मानाने जगता यावे यासाठी विशेष सुरक्षा देणे हे आहे. याशिवाय, पीडित व्यक्तींना आणि त्यांच्या कुटुंबांना आर्थिक मदत व पुनर्वसनाची तरतूद करून त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यास हा कायदा मदत करतो. थोडक्यात, हा कायदा या दुर्बळ घटकांना त्यांच्यावर होणाऱ्या अत्याचारांविरोधात आवाज उठवण्याचे बळ आणि सुरक्षितता प्रदान करतो.

# लॉयर आणि ॲडव्होकेट यांत नेमका फरक काय?

पुणे बार ॲंड बेंच टीम
punebarandbench@gmail.com

आपल्या समाजात 'वकील', 'ॲडव्होकेट' आणि 'बॅरिस्टर' यांसारखे अनेक शब्द सर्रास वापरले जातात, ज्यामुळे अनेकदा गोंधळ निर्माण होतो. काळा कोट आणि पांढरा शर्ट घातलेल्या व्यक्तीला आपण अनेकदा 'वकील' म्हणतो. पण कायद्याच्या क्षेत्रात, हे शब्द एकाच व्यक्तीसाठी वापरले जात असले तरी, त्यांची कायदेशीर भूमिका आणि कार्यक्षमता यामध्ये महत्त्वपूर्ण फरक आहेत.





### लॉयर (Lawyer) म्हणजे कोण?

लॉयर (वकील) ही एक व्यापक संज्ञा आहे.

- **शैक्षणिक पात्रता:** ज्या व्यक्तीने कायद्याचे शिक्षण पूर्ण केले आहे, म्हणजेच L.L.B. (Bachelor of Laws) ही पदवी प्राप्त केली आहे, ती व्यक्ती 'लॉयर' किंवा 'वकील' म्हणून ओळखली जाते.
- **कार्य:**
  - हा व्यक्ती कायदेशीर सल्ला (Legal Advice) देऊ शकतो.
  - तो कायद्याच्या कागदपत्रांचे मसुदे (Drafts) तयार करू शकतो.
- **महत्त्वाची मर्यादा:** एक साधा लॉयर थेट न्यायालयात जाऊन कोणत्याही क्लायंटसाठी खटला लढवू शकत नाही किंवा त्यांची बाजू मांडू शकत नाही.

### ॲडव्होकेट (Advocate) म्हणजे कोण?

ॲडव्होकेट (अधिवक्ता) हे कायदेशीर क्षेत्रात काम करणारे एक व्यावसायिक पद आहे.

- **पात्रता:** कायद्याची पदवी (L.L.B.) प्राप्त केल्यानंतर, ॲडव्होकेटला बार कौन्सिल ऑफ इंडिया (Bar Council of India - BCI) मध्ये नोंदणी (Enrolment) करणे आणि BCI द्वारे आयोजित केलेली ऑल इंडिया बार परीक्षा (All India Bar Examination - AIBE) उत्तीर्ण करणे आवश्यक असते.
- **कार्य:**
  - परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर आणि BCI मध्ये नोंदणी झाल्यावर, ही व्यक्ती न्यायालयात प्रत्यक्ष युक्तिवाद (Plead) करण्यास आणि आपल्या क्लायंटची बाजू मांडण्यास कायदेशीररित्या पात्र ठरते.
  - ते कोणत्याही न्यायालयात (कनिष्ठ, उच्च किंवा सर्वोच्च न्यायालयात) प्रतिनिधित्व (Representation) करू शकतात आणि खटले लढवू शकतात.
- **निष्कर्ष:** ॲडव्होकेट हे न्यायालयात प्रत्यक्ष सराव (Court Practice) करणारे कायदेतज्ज्ञ असतात.

### ठळक फरक एका दृष्टिक्षेपात

- **लॉयर (Lawyer - वकील)**
- **शैक्षणिक पदवी:** फक्त L.L.B. पदवीधारक
- **नोंदणी:** बार कौन्सिल ऑफ इंडिया (BCI) मध्ये नोंदणी आवश्यक नाही.
- **न्यायालयीन सराव:** न्यायालयात खटला लढवू शकत नाही.
- **मुख्य भूमिका:** कायदेशीर सल्लागार, कागदपत्रे तयार करणे.
- **संबंध:** प्रत्येक ॲडव्होकेट हा लॉयर असतो.

- **ॲडव्होकेट (Advocate - अधिवक्ता)**
- **शैक्षणिक पदवी:** L.L.B. पदवीधारक
- **नोंदणी:** BCI मध्ये नोंदणी आवश्यक आणि ऑल इंडिया बार परीक्षा (AIBE) उत्तीर्ण असणे आवश्यक.
- **न्यायालयीन सराव:** न्यायालयात खटला लढवू शकतो.
- **मुख्य भूमिका:** कायदेशीर प्रतिनिधी, खटल्यासाठी युक्तिवाद करणे.
- **संबंध:** प्रत्येक लॉयर हा ॲडव्होकेट असतोच असे नाही.

थोडक्यात, कायद्याचे शिक्षण घेतलेली प्रत्येक व्यक्ती वकील (Lawyer) असते, पण जो वकील बार कौन्सिलमध्ये नोंदणी करून आणि आवश्यक परीक्षा उत्तीर्ण करून न्यायालयात सराव करण्यास पात्र ठरतो, त्यालाच ॲडव्होकेट (Advocate) म्हटले जाते. त्यामुळे, जर तुम्हाला केवळ सल्ला हवा असेल तर तुम्ही लॉयरकडे जाऊ शकता; पण तुम्हाला न्यायालयात खटला लढवायचा असेल तर तुम्हाला ॲडव्होकेटची गरज लागेल.

# सिझेरियन प्रसूतीनंतर टॉवेल आत राहिला

## डॉक्टरांच्या हलगर्जीमुळे मृत्यू: पतीला 26 लाख भरपाई

पुणे बार ॲंड बेंच टीम
punebarandbench@gmail.com

सिझेरियन प्रसूतीनंतर टाकलेल्या टाक्यांच्या हलगर्जीपणामुळे टॉवेल आत राहिला आणि अन दुसऱ्या बाळाच्या आगमनाने वडिलांना झालेला आनंद काही क्षणात दुःखात बदलला. या प्रकरणामुळे हृदयविकाराच्या झटक्याने तीन वर्षे कोमात राहिलेल्या महिलेचा मृत्यू झाला.

यानंतर तिचा पती १४ वर्षे न्यायासाठी लढला. या लढ्यात दोषी ठरवून ग्राहक न्यायालयाने स्त्रीरोगतज्ज्ञ आणि डॉक्टरांवर वैद्यकीय निष्काळजीपणा आणि त्रुटीयुक्त सेवांचा ठपका ठेवला. या महिलेवरील उपचारांचा खर्च, तिच्या मृत्यूमुळे झालेले मानसिक-शारीरिक त्रासाची भरपाई आणि तक्रार खर्चापोटी रुग्णालय व डॉक्टरांना २६.५० लाख भरपाई देण्याचा आदेश दिला.




राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोगाच्या पुणे खंडपीठाचे अध्यक्षीय सदस्य मिलिंद सोनावणे व सदस्य नझीर कुरेशी यांनी हा निकाल दिला. या निकालामुळे शक्तिशिखर रुग्णालयाचा पूर्ण खंडपीठाने निष्काळजीपणा करणे, अस्वच्छ रुग्णालये त्वरित उच्च-सुविधा केंद्रात न पाठविणे, तातडीने वैद्यकीय मदत देणे न देणे ही ग्राहक सेवेतील त्रुटी आणि वैद्यकीय निष्काळजीपणा असल्याचे अधोरेखित झाले असून, त्यासाठी रुग्णाच्या नातेवाइकांना ग्राहक आयोगाकडे दाद मागता येईल. या प्रकरणी धुमाळ येथे रहिवासी प्रशांत कुकडे यांनी सुरेश रखवालदार जीवनदीप मेडिकल सेंटर व डॉक्टर यांच्यावरती पैसे यांच्यावरती राज्य ग्राहक आयोगाकडे दाद मागितली होती. तक्रारदारांच्या वतीने ॲड. ज्ञानराज संत यांनी बाजू मांडली. तक्रारदारांची पत्नी रुपाली यांना दुसऱ्या बाळाच्या प्रसूतीसाठी 6 ऑगस्ट 2006 रोजी संबंधित रुग्णालयात दाखल करण्यात आले.

सिझेरियननंतर टाकलेल्या टाक्यांच्या शरीरात एक टॉवेल राहिल्याने टाके पुन्हा उघडावे लागले. काही वेळातच त्यांच्या हृदयविकाराचा झटका आला. त्यामुळे त्यांना दुसऱ्या रुग्णालयात दाखल करण्यात आले. तिथे त्यांच्यावर तीन दिवस उपचार केल्यानंतर 'एनसेफ्लोपॅथी' झाल्याने वेगळ्या रुग्णालयात नेण्यात आले. मात्र, त्या कोमात गेल्या. तीन वर्षे कोमात राहिल्यानंतर त्यांचे एक मे 2022 रोजी निधन झाले.

### आयोगाचा निष्कर्ष

- प्रसूतीनंतर रुग्ण महिला अस्वस्थ झाली असतानाही तिला तातडीने उच्च दर्जाच्या रुग्णालयात पाठविले नाही.
- रुग्णालय व डॉक्टरांनी 'डिस्चार्ज'सह इतर वैद्यकीय कागदपत्रे दीड महिनानंतर दिली.
- प्रसूतीपूर्व महिले उपाधी अवस्थेत नव्हती; तिची श्वसननलिका सुरक्षित ठेवण्याच्या उपयोगात केलेल्या नाहीत, अशी निष्कर्ष सुसज्ज रुग्णालय व तज्ज्ञ समितीने नोंदविली आहे.
- शक्तिशिखर रुग्णालयातील डॉक्टरांनी अधिक दक्ष राहणे आवश्यक होते.

राज्य ग्राहक आयोगात 2006 मध्ये दाखल झालेल्या या तक्रारीवर तब्बल सतरा वर्षांनी निकाल लागला. विलंबाने का होईना; पण न्याय मिळाला आहे. या निकालामुळे डॉक्टरांच्या कामाच्या पद्धतीवर नियंत्रण ठेवण्यास आणि वैद्यकीय सेवेत पारदर्शकता आणण्यास मदत होईल.

**- ॲड. ज्ञानराज संत,**
तक्रारदारांचे वकील




## पोलिसांना विश्रांती कक्ष हवा

पोलीस कक्षात मूलभूत सुविधांचा अत्यंत अभाव आहे. अनेक तास उभे राहावे लागते, बसायला योग्य जागा नाही. पिण्याचे पाणी आणि स्वच्छ स्वच्छतागृहे यांचीही वानवा असते. महिला पोलिसांना गैरसोयीच्या वातावरणात काम करावे लागते. यामुळे कर्तव्य पार पाडताना पोलिसांना त्रास होतो. न्याय प्रशासनाने पोलीस कर्मचाऱ्यांसाठी एक सुसज्ज विश्रांती कक्ष आणि मूलभूत सुविधा पुरवाव्यात, जेणेकरून आम्ही आमचे कर्तव्य अधिक कार्यक्षमतेने पार पाडू शकू.

– **एक पोलीस कर्मचारी,** पुणे पोलीस शिवाजीनगर

## पार्किंगची गंभीर समस्या

शिवाजीनगर जिल्हा न्यायालयात मेट्रो बांधकाम आणि नवीन इमारतीच्या कामामुळे पार्किंगची समस्या अत्यंत गंभीर झाली आहे. वकील आणि पक्षकारांना आपली वाहने खूप दूर लावावी लागतात, ज्यामुळे मौल्यवान वेळ वाया जातो. वेळेवर पार्किंग न मिळाल्याने सुनावणीला उशीर होतो आणि कोर्टाचे कामकाज विस्कळीत होते. ज्येष्ठ आणि महिला वकिलांना यामुळे खूप त्रास होतो. न्यायालय प्रशासनाने महापालिका आणि मेट्रो प्रशासनाशी समन्वय साधून तात्पुरत्या पर्यायी पार्किंगची व्यवस्था त्वरित करावी, ही सर्व वकील बांधवांची अपेक्षा आहे.

– **ॲड. निलेश पाटील,** वकील धनकवडी

## भोजनगृहाचा (कॅन्टीन) अभाव

पिंपरी-चिंचवड न्यायालयामध्ये (नेहरू नगर) स्वच्छ आणि माफक दरातील कॅन्टीनची सोय नाही. दूरवरून खटल्यांसाठी आलेल्या पक्षकारांना अनेकदा दुपारचे जेवण न करता ताटकळत राहावे लागते. वृद्धांना आणि रुग्णांना याचा खूप त्रास होतो. कोर्टाबाहेर खाण्याचे पर्याय महागडे आणि अस्वच्छ असतात. दिवसभर न्यायाच्या प्रतीक्षेत असलेले नागरिक उपाशी राहतात, हे खेदजनक आहे. न्यायालयात आलेल्या नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी प्रशासनाने त्वरित पुढाकार घेऊन स्वच्छ आणि माफक दरातील कॅन्टीनची सोय उपलब्ध करावी.

– **आशा कांबळे,** पक्षकार गणेश पेठ, पुणे

## पिंपरी-चिंचवडमध्ये वरिष्ठ न्यायालयाचा अभाव

पिंपरी-चिंचवड शहराची लोकसंख्या वाढत असूनही, आमच्या शहरात सत्र न्यायालय किंवा वरिष्ठ दिवाणी न्यायालय उपलब्ध नाही. खून आणि मोठे दिवाणी खटले आजही पुण्याच्या शिवाजीनगर कोर्टात चालतात. यामुळे पक्षकारांना, साक्षीदारांना आणि वकिलांना अवाजवी प्रवास करावा लागतो आणि वेळेचा अपव्यय होतो. स्थानिक स्तरावर न्याय मिळणे हा नागरिकांचा हक्क आहे. न्याय प्रशासनाने पिंपरी-चिंचवडच्या लोकसंख्येचा विचार करून तातडीने वरिष्ठ न्यायालयांची स्थापना करावी, जेणेकरून न्याय स्थानिक स्तरावर आणि जलद मिळेल.

– **ॲड. हेमंत रामभाऊ शिंदे,** वकील, पिंपरी-चिंचवड

## कोर्टाच्या आवारातील अस्वच्छता

शिवाजीनगर न्यायालयाच्या आवारात अस्वच्छता आणि स्वच्छतागृहांची दुरवस्था खूप गंभीर आहे. अनेक ठिकाणी कचऱ्याचे ढिगारे साचलेले असतात आणि दुर्गंधी पसरते. सार्वजनिक स्वच्छतागृहे वापरासाठी पूर्णपणे अयोग्य आहेत. यामुळे महिला पक्षकार, ज्येष्ठ नागरिक आणि कर्मचाऱ्यांची मोठी गैरसोय होते. स्वच्छतेअभावी आरोग्याच्या समस्या निर्माण होण्याची भीती आहे. न्याय प्रशासनाने गांभीर्याने लक्ष घालून त्वरित स्वच्छता मोहीम राबवावी आणि स्वच्छतागृहांची दुरुस्ती करावी, ही कळकळीची विनंती आहे.

– **प्रकाश ओव्हाळ,** सामाजिक कार्यकर्ता, २२/अ, हडपसर गाव

## न्याय मिळण्यास विलंब

मी माझ्या कंपनीच्या एका साध्या दिवाणी खटल्यासाठी गेले तीन वर्षे पुणे जिल्हा न्यायालयात चकरा मारत आहे. प्रत्येक तारखेला काहीतरी कारण देऊन सुनावणी पुढे ढकलली जाते. एका सामान्य कराराच्या वादात जर एवढा विलंब होत असेल, तर सामान्य नागरिकांना तातडीने न्याय कसा मिळणार? (विलंबित न्याय म्हणजे न्याय नाकारणे) ही म्हण इथे खरी ठरत आहे. न्यायालयाने खटल्यांचा निपटारा जलद गतीने करण्यासाठी कठोर धोरणे आणि कालमर्यादा निश्चित करण्याची नितांत गरज आहे. या समस्येमुळे व्यवसायावर आणि मानसिकतेवर गंभीर परिणाम होत आहे.

– **अभिजित शेंडगे,** लघु उद्योजक, कर्वेनगर,

## ग्राहक न्यायालयीन आदेशाची अंमलबजावणी

दोन वर्षांपूर्वी माझ्या फ्लॅटमध्ये झालेल्या फसवणुकीबद्दल मला पुणे जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाने अनुकूल निर्णय दिला. मात्र, दोन वर्षे उलटूनही संबंधित बांधकाम व्यावसायिकाने आयोगाच्या आदेशाचे पालन केलेले नाही. आदेश कागदावर असूनही अंमलबजावणीसाठी पुन्हा न्यायालयात धाव घ्यावी लागते. ग्राहक न्यायालयाचा उद्देश तात्काळ दिलासा देणे आहे, पण आदेशाचे पालन न झाल्यास त्या निकालाला अर्थ उरत नाही. आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी कठोर यंत्रणा हवी.

– **सौ. वैशाली जोगळेकर,** सेवानिवृत्त शिक्षिका बाणेर

## महसूल न्यायालयातील दिरंगाई

जमीन नोंदी आणि सातबारा उताऱ्याशी संबंधित कामांसाठी आम्हाला अनेकदा पुणे तहसीलदारांच्या महसूल न्यायालयात जावे लागते. या खटल्यांमध्ये प्रचंड दिरंगाई आणि भ्रष्टाचार असल्याचे दिसून येते. साध्या कागदपत्रांच्या पडताळणीसाठीही महिनोनमहिने वाट पाहावी लागते. अनेक जुन्या नोंदी अजूनही अद्ययावत झालेल्या नाहीत. महसूल विभागातील 'अर्ध न्यायिक' प्रक्रियांमध्ये पारदर्शकता आणणे आणि ई-गव्हर्नन्सचा प्रभावी वापर करणे आवश्यक आहे. सामान्य शेतकऱ्यांसाठी ही प्रक्रिया सोपी व्हायला हवी.

– **रघुनाथ पाटील,** शेतकरी प्रतिनिधी फुरसुंगी

## शिवाजीनगर न्यायालय परिसरातील अपुरी जागा

पुण्यातील शिवाजीनगर न्यायालयाच्या मुख्य संकुलात रोज हजारो नागरिक, वकील आणि कर्मचारी येतात. मात्र, पार्किंगची समस्या, अपुऱ्या बैठक व्यवस्था आणि गर्दीमुळे निर्माण होणारे गोंधळाचे वातावरण न्यायप्रक्रियेत अडथळा आणते. अनेक न्यायमूर्तींसाठी पुरेशी दालने नसल्याने लहानशा जागेत कामकाज चालते. पायाभूत सुविधांचा अभाव ही पुण्यातील न्यायालयांची सर्वात मोठी अडचण आहे. सरकारने या संकुलाच्या विस्तारासाठी तातडीने निधी उपलब्ध करून देणे गरजेचे आहे.

– **मिलिंद देशपांडे,**
स्वतंत्र पत्रकार (कायदेशीर बाबी) सेनापती बापट रोड



**वाचकांनी आपली पत्रे punebarandbench@gmail.com वर पाठवावीत किंवा, संपादक, पुणे बार अँड बेंच, ऑफिस नं. 7, पहिला मजला, चुनावाला चेंबर्स, शिक्षण मंडळाशेजारी, तोफखाना, शिवाजीनगर, पुणे 5 या पत्त्यावर पाठवावीत.**



# कमी करायला गेला आणि पोटगी सात पटीने वाढली

## ५० हजारांचे झाले ३.५ लाख रुपये, उत्पन्न लपवणाऱ्या पुणेकर पतीला मुंबई उच्च न्यायालयाचा जबरदस्त दणका

पुणे बार अँड बेंच टीम
punebarandbench@gmail.com

मुंबई उच्च न्यायालयाने एका कौटुंबिक वादात अत्यंत महत्त्वपूर्ण निर्णय दिला आहे, ज्यामध्ये पुणे येथील एका उद्योगपतीला आपली पत्नीला द्यावी लागणारी अंतरिम मासिक पोटगी तब्बल सात पटीने वाढवून देण्याचा आदेश दिला गेला आहे.

या जोडप्याचा विवाह १९९७ मध्ये झाला होता आणि २०१३ मध्ये ते वेगळे झाले. घटस्फोटाच्या खटल्यादरम्यान, कौटुंबिक न्यायालयाने पतीने पत्नीला दरमहा ५०,००० रुपये पोटगी देण्याचे निर्देश दिले होते. मात्र, पतीने हा निर्णय उच्च न्यायालयात आव्हान देत, आपली वार्षिक कमाई केवळ ६ लाख रुपये असल्याचे सांगून पोटगीची रक्कम कमी करण्याची मागणी केली. दुसरीकडे, पत्नीने पतीचे खरे उत्पन्न लक्षात घेऊन पोटगीची रक्कम वाढवण्याची विनंती करणारी याचिका दाखल केली.




उच्च न्यायालयात सादर केलेल्या पुराव्यांवरून हे स्पष्ट झाले की, पतीचे कुटुंब स्थावर मालमत्ता, बांधकाम आणि वित्तीय सेवा अशा विविध क्षेत्रांत कार्यरत असलेल्या हजार कोटींहून अधिक मूल्याच्या व्यवसायात गुंतलेले आहे. पतीचा मुलगा परदेशात शिक्षण घेत आहे आणि कुटुंबीय महागड्या वस्तू तसेच परदेशी सुट्ट्यांवर मोठा खर्च करतात. ही सर्व माहिती समोर आल्यावर, न्यायालयाने 'कमाई कमी आहे' असे सांगून न्यायालयाची दिशाभूल करण्याचा पतीचा प्रयत्न फेटाळून लावला आणि हा दावा 'हास्यास्पद' असल्याचे मत नोंदवले.

न्यायालयाने स्पष्ट केले की, पतीने जाणूनबुजून आपली खरी आर्थिक क्षमता लपवली आहे, जेणेकरून त्याला पत्नीला कमी पोटगी द्यावी लागेल. न्यायालयाने हे देखील निरीक्षण नोंदवले की, १६ वर्षांच्या वैवाहिक जीवनात पत्नीने आपली 'आयुष्याची महत्त्वपूर्ण वर्षे' दिली आहेत आणि तिला पतीच्या खऱ्या आर्थिक परिस्थितीनुसार सन्मानपूर्वक जीवन जगण्याचा अधिकार आहे.

पतीचे खोटे दावे आणि त्याची वास्तविक आर्थिक क्षमता विचारात घेऊन, मुंबई उच्च न्यायालयाने कौटुंबिक न्यायालयाचा ५०,००० रुपये मासिक पोटगीचा निर्णय बदलला. न्यायालयाने ही रक्कम सात पटीने वाढवून थेट ३.५ लाख रुपये (साडेतीन लाख रुपये) करण्याचा आदेश दिला. याशिवाय, पतीने आतापर्यंत न दिलेली सुमारे ४२ लाख रुपयांची थकित पोटगी चार आठवड्यांच्या आत पत्नीला देण्याचे निर्देशही न्यायालयाने दिले आहेत. अशाप्रकारे, उत्पन्न लपवण्याचा प्रयत्न करणाऱ्या पुणेकर पतीला मुंबई उच्च न्यायालयाने जबरदस्त दणका दिला आहे.

# बेकायदेशीर निवडणुकांविरोधात एमओएची उच्च न्यायालयात याचिका

पुणे बार अँड बेंच टीम
punebarandbench@gmail.com

महाराष्ट्र ऑलिंपिक असोसिएशन (एमएओ) च्या बेकायदेशीर निवडणुकांविरोधात उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली आहे. या प्रकरणी न्यायालयाने नव्याने निवडणुका घेण्याचा निर्णय द्यावा, अशी मागणी शिवछत्रपती पुरस्कार विजेते आणि महाराष्ट्र सायकलिंग असोसिएशनचे सचिव सूर्यकांत पवार यांनी केली आहे.

पुण्यात आयोजित पत्रकार परिषदेत पवार यांनी सांगितले की, एमएओ ही एक अशासकीय संस्था असून तिचा कारभार आजवर बेकायदेशीरपणे आणि राजकीय दबावाखाली चालला आहे. शासकीय क्रीडा खात्याच्या वरदहस्तामुळे आर्थिक गैरव्यवहार झाल्याचा आरोपही त्यांनी केला.

न्यायालय आणि धर्मादाय आयुक्त कार्यालयाने यापूर्वी एमएओने आयोजित केलेल्या बेकायदेशीर निवडणुकांना पूर्णतः स्थगिती दिली होती आणि त्या रद्द केल्या होत्या. असे असतानाही, २०२५ ते २०२९ या कालावधीसाठीच्या निवडणूक प्रक्रिया पार पाडून २३ नोव्हेंबर रोजी महाराष्ट्र ऑलिंपिक संघटनेची वार्षिक सर्वसाधारण सभा बोलावण्यात आली आहे, जी पूर्णपणे बेकायदेशीर आहे, असे पवार म्हणाले.

पवार यांनी स्पष्ट केले की, महाराष्ट्र ऑलिंपिक संघटनेच्या २०१७ नंतरच्या आणि २०२५ पर्यंतच्या सर्व कार्यकारिणी मंडळांना बेकायदेशीर ठरवण्यात आले आहे. धर्मादाय आयुक्तांनी १७ ऑक्टोबर रोजी याबाबतचा आदेश रद्द केला असून, त्याची प्रत महाराष्ट्र सायकलिंग असोसिएशनला सुपूर्द केली आहे. त्यामुळे सध्याची कार्यकारिणीही बेकायदेशीर ठरली आहे, परिणामी २०२५ नंतरची निवडणूक प्रक्रियाही अवैध ठरते.

२०२५ ते २०२९ च्या निवडणुकीसाठी २०१३ पूर्वीच्या महाराष्ट्र ऑलिंपिक संघटनेच्या मान्यताप्राप्त राज्य संघटनाच पात्र असतील, असेही पवार यांनी सांगितले. निवडणुकीनंतर इतर सर्व राज्य संघटना आणि सहयोगी संघटनांची कागदपत्रे तपासून त्यांना कायदेशीर मान्यता दिली जाईल.

या संघटनेतील काही पदाधिकाऱ्यांविरुद्ध राष्ट्रीय स्पर्धेत प्रचंड भ्रष्टाचार आणि अफरातफर केल्याप्रकरणी फौजदारी खटले दाखल झाले आहेत. त्यांची ईडीमार्फत तसेच क्रीडा संचालनालय, बालेवाडी, पुणे यांच्याकडून चौकशी सुरू आहे. मात्र, या सर्व बाबींकडे दुर्लक्ष करून निवडणूक घेण्यात आली आहे, असेही पवार यांनी नमूद केले. या सर्व बाबी लक्षात घेऊनच उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली आहे.

# मंत्र्यांनी जनता दरबार घेऊ नका, हे त्यांच्या जनता दरबारात जाऊन सांगा : मुंबई उच्च न्यायालयाचा सवाल

## गणेश नाईक यांनी घेतलेल्या जनता दरबाराविरोधात शिवसेनेच्या जिल्हा प्रमुखांनी ठोठावले उच्च न्यायालयाचे दरवाजे

पुणे बार अँड बेंच टीम
punebarandbench@gmail.com

आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नवी मुंबईतील सत्ताधारी भाजपा आणि शिवसेनेतील बेबनाव चव्हाट्यावर आलाय. भाजपाचे ज्येष्ठ नेते आणि मंत्री गणेश नाईक यांच्या जनता दरबाराला शिवसेनेच्या जिल्हाप्रमुखानं आक्षेप घेतला आहे. नाईकांच्या जनता दरबारावर बंदी घालण्याची मागणी करत थेट मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केलीय. मात्र ही याचिका सुनावणीसाठी येताच मुंबई उच्च न्यायालयानं याचिकाकर्त्यांनाच खडे बोल सुनावलेत.

### न्यायालयाकडून याचिकाकर्त्यांची कानउघडणी

शिवसेना नवी मुंबई जिल्हाप्रमुख किशोर पाटकर यांनी दाखल केलेल्या या जनहित याचिकेवर मंगळवारी मुख्य न्यायमूर्ती चंद्रशेखर आणि न्यायमूर्ती गौतम अंखड यांच्या खंडपीठापुढं सुनावणी झाली. तेव्हा, 'मंत्र्यांना जनता दरबार घेऊ नका हे आम्ही का सांगायचं?, याउलट त्या जनता दरबारात जाऊन तुम्हीच त्यांना हा जनता दरबार घेऊ नका असं का सांगत नाही?', असा सवाल करत




मुंबई उच्च न्यायालयानं तूर्तास या प्रकरणी तातडीनं हस्तक्षेप करण्यास नकार दिलाय. ही याचिका आम्ही फेटाळण्याऐवजी याचिकाकर्त्यांनीच ती मागं घेण्याची सूचना न्यायालयानं केली. त्यावर वकिलांनी वेळ देण्याची केलेली विनंती मान्य करत न्यायालयानं कोणतेही निर्देश न देता सुनावणी 9 डिसेंबरपर्यंत तहकूब केली.

### काय आहे प्रकरण

नवी मुंबई आणि ठाणे परिसरात भाजपानं आगामी महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर गणेश नाईकांच्या हाती सूत्र दिल्यापासून सत्ताधारी भाजपा आणि शिवसेना गटातील वाद उफाळून आलाय. भाजपा मंत्री गणेश नाईक हे ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री नसतानाही जिल्ह्यात विविध ठिकाणी दौरे करत नियमितपणे जनता दरबाराचं आयोजन करत आहेत. या जनता दरबारांना नगरिकांचा मोठा प्रतिसाद मिळतोय. मुळात गणेश नाईक यांना ठाणे जिल्ह्यात येऊन जनता दरबार घेण्याचा अधिकार नसताना केवळ महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ठाणे, नवी मुंबई, मीरा भाईंदर व इतर ठिकाणी ते सातत्यानं जनता दरबार घेत असल्याचा आरोप होतोय. याच तक्रारीसह शिवसेना जिल्हाप्रमुख किशोर पाटकर यांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केलीय. यातून त्यांनी गणेश नाईकांना जनता दरबार घेण्यापासून रोखण्याचे आदेश देण्याची मागणी केलीय. तसेच या जनता दरबाराला उपस्थित राहणाऱ्या सरकारी अधिकाऱ्यांवरही कायद्यानुसार कारवाई करावी. इतकंच नव्हे, तर त्यांच्या एका दिवसाचा पगार कापण्यात यावा, अशी मागणीही याचिकेत न्यायालयाकडं करण्यात आलीय.



# खट्याळ खटले!









एका न्यायाधीशांच्या घरी चोरी झाली. दुसऱ्या दिवशी न्यायाधीशांनी पोलिसांना बोलावले.

न्यायाधीशः 'चोर माझ्या घराच्या मागच्या दाराने आत आला आणि त्याने माझ्या पत्नीचे दागिने चोरले.'

पोलीस अधिकारीः 'माय लॉर्ड, तुम्ही चिंता करू नका, आम्ही तपास सुरू करतो.'

न्यायाधीशः 'तपास सुरू करा, पण एक अट आहे.'

पोलीस अधिकारीः 'कोणती अट?'

न्यायाधीशः 'तुम्ही त्या चोराला शोधून काढा, पण त्याला माझ्या कोर्टात आणू नका. जर तो माझ्या कोर्टात आला, तर मला 'नैतिक' दृष्ट्या त्याला निर्दोष सोडावं लागेल.'

पोलीस अधिकारीः 'का? पण का?'

न्यायाधीशः 'कारण, त्याने चोरी करण्यापूर्वी माझ्या घराच्या मागच्या दाराची कडी तपासण्याची 'पुरेशी काळजी' घेतली नव्हती, आणि माझ्या घरात 'सशर्त प्रवेशाचे उल्लंघन' केले आहे. या दोन्ही गोष्टी सिद्ध झाल्यास, माझा वकील त्याला निर्दोष सिद्ध करेल! मला माझ्या घराचा चोर 'कायदेशीर' दृष्ट्या निर्दोष झालेला नको आहे!'

..............................

**एका यशस्वी वकिलाचा मित्र त्याला विचारतोः**

मित्रः 'तू इतका यशस्वी कसा झालास? तू नेहमीच तुमच्या क्लायंटला जिंकून देतोस. तुझं रहस्य काय आहे?'

वकीलः 'माझं एकच तत्त्व आहेः 'मी कधीही क्लायंटला निर्दोष सिद्ध करत नाही.'

मित्रः 'काय? पण हे कसं शक्य आहे? मग तू खटले कसे जिंकतोस?'

वकीलः 'मी क्लायंटला निर्दोष सिद्ध करत नाही, कारण ते नैतिकदृष्ट्या आणि कायदेशीरदृष्ट्या एक आव्हान आहे. त्याऐवजी, मी हे सिद्ध करतो की, सरकारी वकील जे काही म्हणत आहेत, ते निर्दोष सिद्ध करण्यापेक्षा अधिक चुकीचे आहे!'

मित्रः 'याचा अर्थ?'

वकीलः 'याचा अर्थ असा की, माझा क्लायंट कदाचित गुन्हेगार असेल, पण 'कायदेशीर त्रुटी'मुळे त्याला निर्दोष सोडावे लागेल. माझा व्यवसाय 'सत्य' शोधणे नाही, तर 'त्रुटी' शोधणे आहे. 'सत्य' हे उपयुक्त नसते, 'त्रुटी' उपयुक्त असते!'

..................................



एका अत्यंत गुंतागुंतीच्या आणि दीर्घकाळ चाललेल्या खटल्यातून क्लायंट (पक्षकार) निर्दोष सुटतो. आनंदित होऊन तो वकिलाच्या कार्यालयात येतो आणि त्याला विचारतोः

क्लायंटः 'वकीलसाहेब, मी जिंकलो! पण मला एक सांगा, या खटल्यात 'न्याय' झाला की 'कायदा' जिंकला?'

वकीलः (खुर्चीवर मागे रेलून, हसून) 'नाही. या दोन्हीपैकी काहीही झाले नाही.'

क्लायंटः 'मग काय झाले?'

वकीलः 'या खटल्यात फक्त एक गोष्ट जिंकलीः 'माझी फी'.'

क्लायंटः 'पण कायदेशीर सत्य काय आहे?'

वकीलः 'कायदेशीर सत्य हे अत्यंत लवचिक असते. ते तुम्ही मला किती पैसे देता आणि मी न्यायाधीशांना कोणता कायदा वाचायला लावतो, यावर अवलंबून असते.'

क्लायंटः 'म्हणजे, मी दोषी होतो की निर्दोष, हे तुमच्या फीवर अवलंबून होते?'



वकीलः 'अगदी बरोबर! कारण, जर तुम्ही दोषी असाल आणि तुमच्याकडे जास्त पैसे असतील, तर मी ते सिद्ध करेन की, 'कायदा' तुमच्या बाजूने आहे. आणि जर तुम्ही निर्दोष असाल आणि तुमच्याकडे पैसे नसतील, तर मी तुम्हाला सल्ला देईन की, 'सत्य' बोलणे हे कधीकधी स्वस्तात पडते.'

..........................................

**गोपनीय माहिती**

कोर्टात एका साक्षीदाराला विचारले जातेः 'तुम्ही आरोपीला ओळखता का?'

साक्षीदारः 'होय.'

वकीलः 'तो माणूस तुमच्यासाठी कोण आहे?'

साक्षीदारः 'ते मी तुम्हाला सांगू शकत नाही; ही गोपनीय माहिती आहे.'



वकीलः 'तुम्ही गोपनीयतेची शपथ घेतली आहे का?'

साक्षीदारः 'नाही, पण मला वाटते की त्याने मला दिलेले पैसे गुप्त ठेवले पाहिजेत.'

..................................................

**घटस्फोट आणि मालमत्ता**

घटस्फोटाच्या कोर्टात पत्नी न्यायाधीशांनाः 'माय लॉर्ड, मला माझ्या नवऱ्याकडून आमच्या लग्नाच्या 15 वर्षांची भरपाई हवी आहे.'

न्यायाधीशः 'तुम्ही कशाची भरपाई मागताय?'

पत्नीः 'मी मागच्या 15 वर्षांत त्याच्यासाठी जेवण बनवलं, कपडे धुतले आणि त्याची काळजी घेतली. मला त्याचे मेहनताऱ्याचे पैसे हवे आहेत.'

नवरा लगेच उभा राहूनः 'माय लॉर्ड, मग मलाही 15 वर्षांच्या 'वाईट जेवण' आणि 'न धुतलेल्या कपड्यां'ची भरपाई हवी आहे!'

..........................................

**सत्य आणि न्यायाची गती**

न्यायाधीश कोर्टातील लोकांना उद्देशूनः 'या कोर्टात केवळ सत्य आणि न्याय महत्त्वाचा आहे.'

एक वृद्ध पक्षकार कुजबुजतोः 'सत्य आणि न्याय? होय, माय लॉर्ड, पण सत्याची गती इतकी मंद आहे की कोर्टात येईपर्यंत ते निवृत्त झालेलं असतं.'

................................................

न्यायाधीश आरोपीलाः 'तुम्ही तुमच्या गुन्ह्यावर पश्चाताप व्यक्त करता का?'

आरोपीः 'होय, माय लॉर्ड. मला खूप पश्चाताप आहे... की मी पकडला गेलो!'

...........................................

**निर्णयाची गती**

न्यायाधीशः 'मी या केसमध्ये त्वरित निर्णय देणार आहे.'

वकीलः 'पण माय लॉर्ड, तुम्ही अजून पुरावे आणि साक्षीदार पूर्णपणे तपासले नाहीत.'

न्यायाधीशः 'होय, मला माहित आहे, पण मला आज रात्री फुटबॉलचा अंतिम सामना पाहायचा आहे!'

.....................................

**कायद्याची व्याख्या**

एक नव्याने वकील झालेला मुलगा आपल्या वडिलांना (जे अनुभवी वकील आहेत) विचारतोः

मुलगाः 'बाबा, मला एक गोष्ट सांगा, कायदा म्हणजे नेमकं काय?'


वडीलः (चष्मा नीट करत) 'बेटा, कायदा म्हणजे एक खूप मोठे आणि गुंतागुंतीचे जाळे आहे.'

मुलगाः 'ते कशासाठी?'

वडीलः 'हे जाळे छोटे मासे पकडण्यासाठी आणि मोठे मासे बाहेर पडण्यासाठी तयार केलेले असते!'



# डिकोडिंग द डिजिटल: अ गाईड टू सायबर लॉज इन इंडिया





डॉ. अनन्या शर्मा आणि ॲड. रोहन मेहता यांचे 'डिकोडिंग द डिजिटलः अ गाईड टू सायबर लॉज इन इंडिया' हे पुस्तक २०२४ च्या सुरुवातीला अशा महत्त्वपूर्ण वेळी आले आहे, जेव्हा भारताचा डिजिटल लँडस्केप वेगाने विस्तारत आहे, ज्यामुळे अभूतपूर्व संधी आणि गुंतागुंतीच्या कायदेशीर समस्या दोन्ही समोर येत आहेत. हे पुस्तक भारतातील सायबर कायद्याच्या चौकटीचे सर्वसमावेशक आणि अद्ययावत विश्लेषण सादर करते, ज्यामध्ये प्रामुख्याने माहिती तंत्रज्ञान अधिनियम, २००० आणि त्याच्या त्यानंतरच्या सुधारणांवर, तसेच डिजिटल क्रियाकलापांवर परिणाम करणाऱ्या इतर संबंधित कायद्यांवर आणि नियमांवर लक्ष केंद्रित केले आहे.

लेखक डेटा गोपनीयता आणि संरक्षण (डेटा प्रायव्हसी अँड प्रोटेक्शन), सायबर गुन्हे (हॅकिंग, फिशिंग, सायबरस्टॉकिंग आणि ऑनलाइन फसवणूक यासह), ई-कॉमर्स नियम, डिजिटल युगातील बौद्धिक संपदा अधिकार (इंटेलेक्चुअल प्रॉपर्टी राईट्स), आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आणि ब्लॉकचेनसारख्या उदयोन्मुख तंत्रज्ञानाभोवतीचे कायदेशीर बाबी यासारख्या महत्त्वपूर्ण क्षेत्रांचा सखोल अभ्यास करतात. पारंपारिक कायदेशीर तत्त्वे आणि डिजिटल क्षेत्राची अद्वितीय वैशिष्ट्ये यांच्यातील परस्परसंबंधांचे परीक्षण या पुस्तकाला विशेषतः संबंधित बनवते, ज्यामुळे कार्यक्षेत्राचे प्रश्न (ज्युरीसडिक्शन), सायबर प्रकरणांमधील पुरावे, आणि मध्यस्थांची भूमिका याबद्दल अंतर्दृष्टी मिळते.

# लॉ ऑफ एव्हिडन्स सिम्प्लिफाईड: अ प्रॅक्टिकल गाईड फॉर लॉयर्स अँड स्टुडंट्स

न्यायमूर्ती बी.डी. सिंग (निवृत्त) यांच्याद्वारे लिखित 'लॉ ऑफ एव्हिडन्स सिम्प्लिफाईडः अ प्रॅक्टिकल गाईड फॉर लॉयर्स अँड स्टुडंट्स' हे भारतीय कायद्याच्या सर्वात मूलभूत परंतु गुंतागुंतीच्या विषयांपैकी एक असलेल्या पुराव्याच्या कायद्यावर आधारित आहे. २०२३ च्या अखेरीस प्रकाशित झालेले हे पुस्तक, भारतीय पुरावा अधिनियम, १८७२ च्या जटिल तरतुदींना अत्यंत सुलभ आणि व्यावहारिक पद्धतीने सादर करण्याचा उद्देश ठेवते. न्यायमूर्ती सिंग, न्यायालयातील अनेक दशकांच्या अनुभवानुसार, पुराव्याच्या नियमांचा कोर्टरूममधील वास्तविक जगात कसा उपयोग होतो, यावर लक्ष केंद्रित करणारी एक अनोखी दृष्टी आणतात.

पुस्तकाची रचना तार्किक आहे, ज्यामध्ये तथ्यांची प्रासंगिकता, कबुलीजबाब, मृत्यूपूर्व विधाने (डाईंग डिक्लरेशन), तज्ञांचे मत, आणि पुराव्याचा भार (बर्डन ऑफ प्रूफ) यांसारख्या संकल्पनांना सहज समजतील अशा अध्यायांमध्ये विभागले आहे. या पुस्तकाचे वैशिष्ट्य म्हणजे व्यावहारिक परिस्थिती आणि अलीकडील महत्त्वपूर्ण निर्णयांवर (लँडमार्क जजमेंट्स) दिलेला जोर, ज्यामुळे वाचकांना कायदा काय सांगतो हेच नव्हे, तर विविध वास्तविक तथ्यांच्या परिस्थितीत तो कसा लागू केला जातो हे देखील कळते. यात पुराव्याच्या कायद्याच्या अर्थाला आकार देणाऱ्या नवीनतम सुधारणा आणि न्यायिक निर्णयांचे सर्वसमावेशक विश्लेषण समाविष्ट आहे.





हे मार्गदर्शक कायद्याच्या परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी, वकिलीच्या सुरुवातीच्या वर्षांमध्ये मार्गदर्शन करणाऱ्या तरुण वकिलांसाठी, आणि पुराव्याच्या तत्त्वांवर स्पष्ट व संक्षिप्त माहिती शोधणाऱ्या अनुभवी वकिलांसाठी एक अमूल्य साधन आहे. त्याची सुगम भाषा आणि व्यावहारिक दृष्टिकोन याला कोणत्याही कायदेशीर ग्रंथालयात एक आवश्यक स्थान देतात, जे सैद्धांतिक ज्ञान आणि व्यावहारिक अनुप्रयोग यांच्यातील अंतर भरून काढते.

# इन्सॉल्व्हन्सी अँड बँकरप्सी कोड, 2016: अ प्रॅक्टिकल कॉमेंटरी अँड ॲनालिसिस

ॲड. राजीव मेनन यांच्याद्वारे लिखित 'इन्सॉल्व्हन्सी अँड बँकरप्टसी कोड, २०१६: अ प्रॅक्टिकल कॉमेंटरी अँड ॲनालिसिस' हे पुस्तक कॉर्पोरेट दिवाळखोरी आणि पुनर्संघटन यांसारख्या गंभीर कायदेशीर क्षेत्रावर प्रकाश टाकते. २०२० च्या अखेरीस प्रकाशित झालेले हे पुस्तक, कॉर्पोरेट जगतात गेम चेंजर ठरलेल्या इन्सॉल्व्हन्सी अँड बँकरप्टसी कोड (IBC), २०१६ च्या प्रत्येक पैलूचे तपशीलवार आणि व्यावहारिक विश्लेषण सादर करते. ॲड. मेनन, जे दिवाळखोरी कायद्यात (Insolvency Law) अनेक वर्षांचा अनुभव असलेले प्रख्यात वकील आहेत, त्यांनी हे पुस्तक अशा प्रकारे संरचित केले आहे की ते कॉर्पोरेट जगतातील व्यावसायिक, वित्तीय संस्था, वकील, दिवाळखोरी व्यावसायिक (Insolvency Professionals) आणि कायदा विद्यार्थी या सर्वांसाठी उपयुक्त ठरेल.

या ग्रंथात आयबीसी (IBC) च्या मूळ तत्त्वज्ञानापासून ते राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण (NCLT) आणि अपीलिय न्यायाधिकरण (NCLAT) यांच्या नवीनतम निकालांपर्यंतचा सर्वसमावेशक प्रवास दिलेला आहे. यात कॉर्पोरेट इन्सॉल्व्हन्सी रिझोल्यूशन प्रोसेस (CIRP), लिक्विडेशन प्रक्रिया, वैयक्तिक हमीदारांवरील (Personal Guarantors) दिवाळखोरी प्रक्रिया, आणि क्रॉस-बॉर्डर इन्सॉल्व्हन्सी (आंतर-सीमा दिवाळखोरी) च्या उदयोन्मुख संकल्पनांवर विशेष जोर देण्यात आला आहे. आयबीसी (IBC) मध्ये कोविड-१९ महामारी दरम्यान आलेल्या महत्त्वाच्या सुधारणा आणि सर्वोच्च न्यायालयाच्या महत्त्वपूर्ण निर्णयांचे विश्लेषणात्मक भाष्य (Analytical Commentary) या पुस्तकाचे मुख्य वैशिष्ट्य आहे.

हे पुस्तक केवळ कायद्याच्या तरतुदी स्पष्ट करत नाही, तर प्रत्येक टप्प्यावर सहभागी असलेल्या विविध स्टेकहोल्डर्सच्या जबाबदाऱ्या आणि हक्क यावर व्यावहारिक मार्गदर्शन प्रदान करते. कॉर्पोरेट दिवाळखोरीच्या गुंतागुंतीच्या प्रक्रियेत नेव्हिगेट करण्यासाठी, तसेच या कायद्याच्या अंमलबजावणीच्या आव्हानांना आणि संधींना समजून घेण्यासाठी हा ग्रंथ एक अनिवार्य संदर्भ बनला आहे. हे भारतातील आर्थिक कायद्याच्या गतिशील स्वरूपाचे प्रतीक आहे आणि कायदेशीर समुदायासाठी एक मौल्यवान साधन आहे.




# दलाल आणि कर्मचाऱ्यांच्या मदतीने केल्या बनावट वकिलांच्या नोंदी; दोघांवर कारवाई

## दिल्ली बार कौन्सिलमध्ये मोठे रॅकेट असण्याची शंका, बार कौन्सिल ऑफ इंडियाची कडक कारवाई

पुणे बार अँड बेंच टीम
punebarandbench@gmail.com

बार कौन्सिल ऑफ इंडियाने (बीसीआय) दिल्ली बार कौन्सिलमध्ये वकिलीसाठी नाव नोंदवण्यासाठी वापरलेली एक मोठी बनावट कायद्याची पदवी (Law Degree) उघडकीस आणली आहे. या गंभीर प्रकरणातून वकिली व्यवसायात अवैध मार्गाने प्रवेश मिळवण्याचे एक संघटित आणि पद्धतशीर रॅकेट सुरू असल्याचे स्पष्ट झाले असून, BCI ने यावर कठोर कारवाई सुरू केली आहे.

ॲडव्होकेट जे. वसंतन यांनी BCD मध्ये नोंदणीसाठी सादर केलेल्या कागदपत्रांबाबत BCI ला तक्रार मिळाली होती. तपासणी केली असता त्यांची LLB पदवी आणि गुणपत्रिका खोटी असल्याचे सिद्ध झाले. यानंतर वसंतन यांनी BCI समोर कबूल केले की, त्यांनी 'टॉट्स' (दलाल) आणि BCD मधील एका कर्मचाऱ्याच्या मदतीने पैसे देऊन बनावट कागदपत्रे वापरून वकिलीसाठी नोंदणी मिळवली होती.




### 'आतील' आणि 'बाहेरील' लोकांचा सहभाग

BCI च्या तपासात, गेल्या २० वर्षांपासून BCD मध्ये काम करणारा कर्मचारी जगदीश याचा या फसवणुकीत थेट सहभाग असल्याचे उघड झाले आहे. तसेच, अरबिंद पांचाल नावाचा असलेला वकीलही यात सामील असल्याचे स्पष्ट झाले आहे.

यावर तीव्र चिंता व्यक्त करताना BCI ने म्हटले की, 'खोट्या शैक्षणिक कागदपत्रांच्या आधारावर बेकायदेशीर नोंदणी घडवून आणणाऱ्या दलाल, मध्यस्थ आणि कार्यालयातील लोकांचे एक मोठे गुन्हेगारी नेटवर्क सक्रिय आहे.' जगदीश अनेक वर्षांपासून BCD मध्ये असल्याने, यापूर्वीही अशा खोट्या नोंदी झाल्या असण्याची शक्यता BCI ने वर्तवली आहे.

या घटनेनंतर BCI ने तातडीने कारवाई करत ऍडव्होकेट वसंतनचे नाव बनावट कागदपत्रांच्या आधारावर नोंदणी केल्यामुळे वकिलीच्या यादीतून काढून टाकले आहे. BCD ने कर्मचारी जगदीशला तातडीने कामावरून बडतर्फ केले आहे.

BCI ने दिल्ली बार कौन्सिलला (BCD) महत्त्वाचे निर्देश दिले आहेत. जगदीश किंवा पांचाल यांचा सहभाग असलेल्या मागील सर्व नोंदींची तातडीने, सविस्तर आणि वेळेत चौकशी करावी आणि दोषींवर कडक कारवाई करावी, असे BCI ने स्पष्ट केले आहे.

यासोबतच, वसंतनला चारित्र्य प्रमाणपत्र देणाऱ्या दोन वकिलांवरही कारवाई करण्याचे आदेश BCD ला देण्यात आले आहेत.

## पैशासाठी पालक मुलाच्या मृत्यूचा गैरफायदा घेणार नाही!

पुणे बार अँड बेंच टीम
punebarandbench@gmail.com

साधारण १७ वर्षांपूर्वी लोकल ट्रेनच्या प्रवासात झालेल्या तरुणाच्या मृत्यूप्रकरणी उच्च न्यायालयाने तरुणाच्या पालकांना ८ लाख रुपयांची भरपाई मंजूर केली. मृत तरुण वैध प्रवासी नव्हता, असा निष्कर्ष काढत रेल्वे दावे न्यायाधिकरणाने नऊ वर्षांपूर्वी भरपाईचा दावा फेटाळला होता. त्याविरोधातील पालकांचे अपील उच्च न्यायालयाने मंजूर केले. भरपाईसाठी पालक आपल्या मुलाच्या मृत्यूचा फायदा उठवणार नाहीत, असे निरिक्षण न्यायमूर्ती जितेंद्र जैन यांनी नोंदवले.

जोगेश्वरी पूर्वेकडील इंदिरा नगर येथील रहिवासी असलेल्या १७ वर्षांच्या तरुणाचा ५ सप्टेंबर २००८ रोजी रात्री अपघाती मृत्यू झाला. गणेशोत्सवादरम्यान तो मित्रांसोबत लालबाग येथे गणपतीचे दर्शन घेण्यासाठी जोगेश्वरी स्टेशनवरून लोअर परळ स्टेशनला लोकल ट्रेनने प्रवास करीत होता. एल्फिन्स्टन आणि लोअर परळ स्टेशनदरम्यान ट्रेनच्या गर्दीमुळे तो खाली पडला आणि त्याचा अपघाती मृत्यू झाला होता. मात्र रेल्वे दावे न्यायाधिकरणाने तो वैध प्रवासी नसल्याचा निष्कर्ष काढला होता. त्याच आधारे २९ जानेवारी २०१६ रोजी भरपाईचा दावा फेटाळला होता. त्या निर्णयाविरोधात तरुणाच्या पालकांनी ॲड. दीपक आजगेकर यांनी उच्च न्यायालयात अपिल दाखल केले होते. त्यावर सुनावणी घेत न्यायमूर्ती जितेंद्र जैन यांनी मृत तरुणाच्या पालकांना दिलासा दिला.

# दिव्यांग वकिलासाठी कोर्टरूम हलवण्यास नकार

## सुनावणी दरम्यान व्हिडिओ कॉन्फरन्सिंगचा पर्याय सुचवला, केरळ उच्च न्यायालयाचा महत्त्वाचा निर्णय

पुणे बार अँड बेंच टीम
punebarandbench@gmail.com

केरळ उच्च न्यायालयाने नुकत्याच दिलेल्या एका निकालात, एका मधुमेहग्रस्त वकिलाला पायऱ्या चढणे शक्य नसल्याने खटल्यातील उलटतपासणीसाठी कोर्टरूम तात्पुरती पहिल्या मजल्यावरून तळमजल्यावर स्थलांतरित करण्याची याचिका फेटाळली आहे. न्यायमूर्ती सी.एस. डायस यांनी हे मत व्यक्त केले की, वकिलांना येत असलेल्या अडचणींबाबत न्यायालयांनी सहानुभूती बाळगली पाहिजे, पण न्यायव्यवस्थेच्या कामात अडथळा येणार नाही अशा व्यावहारिक पर्यायांचा विचार करणे आवश्यक आहे.




याचिकाकर्ते हे पालक्काड येथील अतिरिक्त सत्र न्यायालयासमोर प्रलंबित असलेल्या एका खटल्यातील आरोपी आहेत. त्यांचे वकील वयोवृद्ध असून त्यांना मधुमेह-संबंधित न्यूरोपॅथीसह अनेक शारीरिक व्याधी आहेत. कोर्टरूम पहिल्या मजल्यावर असल्याने वकिलांना पोहोचता न आल्याने, खटला पुढे ढकलण्याची त्यांची विनंती ट्रायल कोर्टाने फेटाळली होती. आरोपींमध्ये अटकेतील असल्याने उच्च न्यायालयाने यापूर्वीच खटला मार्चपर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश दिले होते.

याचिकाकर्त्यांनी एका जुन्या प्रकरणाचा दाखला दिला असला तरी, सरकारी वकिलांनी या मागणीला विरोध केला, कारण खटला एका दिवसात पूर्ण होणारा नाही आणि कोर्टरूम स्थलांतरित केल्यास निर्धारित वेळेत खटला पूर्ण करणे शक्य होणार नाही. न्यायालयाने हा युक्तिवाद मान्य करत, तळमजल्यावरील न्यायालये नियमितपणे मोठ्या कामाच्या ओझ्याखाली असल्याने कोर्टरूम स्थलांतरित करणे व्यावहारिक नाही, असे स्पष्ट केले.

न्यायालयाने वकिलांच्या अडचणींप्रति संवेदनशीलता दाखवली, पण 'न्यायदानाचे कार्य थांबवता येणार नाही' असे ठामपणे सांगितले. न्यायालयाने 'वकील आणि न्यायपीठ हे न्याय रथाची दोन चाके आहेत' असे नमूद करत, सध्याच्या हायब्रीड सुनावणीच्या युगात इलेक्ट्रॉनिक व्हिडिओ लिंकेज वापरणे किंवा दुसरे वकील नियुक्त करणे यांसारखा व्यावहारिक पर्याय शोधण्याचा सल्ला दिला.

अखेरीस, उच्च न्यायालयाने वकिलांना बरे होण्यासाठी किंवा पर्यायी व्यवस्था करण्यासाठी खटला पुढे ढकलण्याची विनंती अंशतः मान्य केली आणि ट्रायल कोर्टाचा अर्ज फेटाळणारा आदेश रद्द केला. मात्र, कोर्टरूम तळमजल्यावर हलवण्याची मागणी फेटाळली. तसेच, वकिलांनी व्हीसीद्वारे साक्षीदारांची उलटतपासणी करण्याची मागणी केल्यास, त्यावर कायद्यानुसार विचार केला जाईल, असे निर्देश दिले.

Registration(PRGI) No. MHBIL/25/A1380: Published for the Pune Bar and Bench by the Managing Editor Adv. Vishal Vijayrao Kale at Pune Bar And Bench, Office No. 7, 1st floor, Chunawala Chambers , 103, Near Shikshan Mandal, Topkhana, Shivajinagar, Pune-411005 and printed by Prasad Shantaram Pathak, 595, Budhwar Peth, Pune-411002 at the press -Sakal Media Pvt Ltd, Sr No. 159/160, behind Laxman Weight Bridge, Saswad Road, Pune- 411028. Resident Editor (Pune): Vijay Prabhakar Chavan (Responsible for selection of news under PRB Act.) All rights reserved. Reproduction in whole or in part without written permission of the publisher is prohibited.